cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४० | मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘लवकर येणारा मान्सून : दिलासा की नवी चिंता?’

एप्रिलच्या कडक उन्हाने हैराण झालेल्या जनतेसाठी यंदाचा मान्सून आशेचा किरण ठरताना दिसत आहे. तापमानाने चाळीशी ओलांडून अनेक ठिकाणी ४६ अंशांपर्यंत झेप घेतली असताना, पावसाच्या आगमनाच्या बातम्यांनी दिलासा दिला आहे. विशेष म्हणजे यंदा मान्सून मे अखेरीसच भारतात दाखल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हवामानातील बदलत्या घडामोडींमध्ये हा अंदाज केवळ आनंददायी नाही, तर अनेक प्रश्नही उपस्थित करणारा आहे.

# शेतकऱ्यांची चिंता! राज्यातील खत-बियाणे विक्रेते संपावर

**पुणे । प्रतिनिधी**

**खरीप हंगामाची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात असतानाच, राज्यातील शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी चिंतेची बातमी समोर आली आहे. आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी ‘महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टीसाइड, सीडस्? डीलर्स असोसिएशन’ने (माफदा) पुकारलेल्या राज्यव्यापी बेमुदत बंदला आज, २७ एप्रिलपासून सुरुवात झाली आहे.राज्यातील सर्वच जिल्ह्यात आणि ग्रामीण भागातील खत आणि बियाणे विक्री ठप्प झाली आहे.**

विक्रेत्यांनी सरकारसमोर १४ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत, ज्यामध्ये कंपन्यांकडून खतांचा पुरवठा करताना इतर अनावश्यक उत्पादने (लिंकिंग) विक्रेत्यांच्या माथी मारणे थांबवावे. अवैध एचटीबीटी बियाण्यांच्या तस्करीवर कठोरपणे आळा घालण्यात यावा. ‘साथी’ पोर्टल ॲप वापरण्याची सक्ती केवळ किरकोळ विक्रेत्यांवर न ठेवता ती उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांच्या स्तरावर लागू करावी. बियाण्यांचे नमुने निकृष्ट आढळल्यास



विक्रेत्यांना थेट ‘आरोपी’ न करता ‘साक्षीदार’ म्हणून वागणूक द्यावी. गुणवत्ता तपासणीसाठी प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या नमुन्यांची अनेक वर्षांपासूनची थकीत रक्कम त्वरित अदा करावी.या संदर्भात विक्रेत्यांनी जिल्हाधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने दिली आहेत. मात्र, शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने व्यापाऱ्यांमध्ये मोठा असंतोष आहे. “आम्ही वारंवार विनंत्या करूनही शासन ठोस निर्णय घेत नाही. जोपर्यंत आमच्या तक्रारींचे आठ दिवसांत निवारण होत नाही, तोपर्यंत हा बंद सुरूच राहील,” असा पवित्रा संघटनेने घेतला आहे.या संदर्भात शासनाने तातडीने खते बी बियाणे विक्रेत्यांच्या बाबतीत निर्णय घ्यावा अन्यथा हे आंदोलन चालूच रहाणार असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे हे जर असेच राहिले तर शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल मराठवाडा विदर्भ पश्चिम महाराष्ट्र खान्देश आदी विभागात आजच्या बंदला प्रतिसाद मिळाल्याने आज शेतकऱ्यांनी आगामी काळातील चिंता व्यक्त केली.

## थोडक्यात...

### रशियन तेलासाठी फिलीपिन्सला सूट

वॉशिंग्टन : मध्य पूर्वेतील सध्याचा तणाव आणि जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेने फिलीपिन्सला मोठा दिलासा दिला आहे. फिलीपिन्सने काही दिवसापूर्वी अमेरिकेकडे रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली होती, याला प्रतिसाद देत, अमेरिकेने रशियन तेल आणि पेट्रोलियम उत्पादने खरेदी करण्यासाठी तात्पुरती सूट दिली आहे. गेल्या आठवड्यात, तेलाच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी ट्रम्प यांनी रशियन तेल खरेदीवरील ही सूट वाढवली. याचा फायदा भारतालाही होत आहे, पण फिलीपिन्सला त्याहूनही अधिक दिलासा देण्यात आला आहे.

### भारत–न्यूझीलंड करारावर शिक्कामोर्तब

नवी दिल्ली : भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज, २७ एप्रिल रोजी मुक्त व्यापार करारावर अधिकृतपणे स्वाक्षरी करण्यात आली आहे. दोन्ही देशांमधील वस्तू आणि सेवांचा व्यापार वाढवणे आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे हा या कराराचा मुख्य उद्देश आहे. हा करार दोन्ही पक्षांनी ठरवलेल्या तारखेपासून लागू होईल. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत भारतात सुमारे २० अब्ज डॉलरची थेट परदेशी गुंतवणूक करण्याचं आश्वासन दिलं आहे. एप्रिल २००० ते डिसेंबर २०२५ दरम्यान भारताला न्यूझीलंडकडून केवळ ८.९ कोटी डॉलरची गुंतवणूक मिळाली होती.

### इंधन टाक्यांच्या स्फोट ८ कोटी लीटर तेल वाया

तेहरान : इराणची राजधानी तेहरानमध्ये वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या हवाई हल्ल्यांत इंधन साठवणुकीच्या टाक्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तेहरानचे राज्यपाल मोहम्मद सादेग मोतामेदियन यांनी या घटनेची पुष्टी करताना सांगितले की, या घटनेत ८ कोटी लिटरहून अधिक इंधन जळून खाक झाले आहे. या नुकसानीमुळे आता शहरात इंधन आणि ऊर्जेची मोठी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.राज्यपालांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्याच्या संकटकाळात तेहरानमधील इंधनाच्या वापरात सुमारे ५० टक्क्यांनी घट झाली आहे. नाकेबंदी आणि युद्धाच्या भीतीमुळे रस्ते ओस पडले असून ट्रॅफिकमध्ये मोठी घट झाली आहे. खाजगी वाहने वापरण्याऐवजी नागरिक आता मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत आहेत.

## आता मराठी बोलावीच लागणार!

### महायुतीमधील भाजप शिवसेना राष्ट्रवादी पक्षाचे एकमत

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून मराठी भाषेच्या मुद्द्यावरुन वातावरण तापलं आहे. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्व टॅक्सी आणि रिक्षा चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची केली आहे. तसेच मराठी बोलता आली नाही तर थेट परवाना रद्द केला जाईल, असा कडक नियम लागू करण्यात येणार आहे. येत्या १ मे महाराष्ट्र दिनापासून या नियमांचे कडकपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. याच प्रकरणात आज महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. विशेष म्हणजे या मुद्द्यावर आता महायुतीच्या पक्षांचे एकमत होताना दिसत आहे.**



रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी सक्तीच्या निर्णयाला शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी कुणाला कुठल्याही भाषेची सक्ती करणं योग्य नसल्याचं म्हटलं आहे. असं असलं तरी शिवसेनेचे नेते तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे मराठी सक्तीसाठी आग्रही आहेत. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल ▶▶ पान २ वर

## संघर्ष संपणार की चिघळणार

### इराणने अमेरिकेसमोर मांडली नवी ‘त्रिसूत्री’ अट

**नवीदिल्ली । वृतसंस्था**

इराणने अमेरिकेसमोर शांतता चर्चेचा त्रिसूत्री प्रस्ताव मांडला आहे. पाकिस्तानात पार पडलेल्या दोन्ही चर्चा निष्फळ ठरल्यानंतर इराणने हा प्रस्ताव अमेरिकेसमोर ठेवण्याचा निर्णय केला आहे. शांतता चर्चा यशस्वी करायची असेल तर अमेरिकेला या त्रिसूत्री चर्चेच्या तीनही टप्प्यातून जावं लागेल असे इराणचे म्हणणे आहे. या तीन टप्प्यात इराणने होर्मुझची सामुद्रधुनी, लेबनॉनविरुद्धचे युद्ध आणि विशेषतः अणुसाठा याबाबतचे मुद्दे मांडले आहेत. आता अमेरिका हा प्रस्ताव मान्य करेल की, ही चर्चा पुन्हा निष्फळ ठरेल? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, यावेळी अमेरिकेने नाही तर, इराणने शांतता चर्चेसाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे ▶▶ पान २ वर

#### प्रस्तावातील तीन टप्पे कोणते?.

१ इराणने अमेरिकेसमोर मांडलेल्या त्रिसूत्री प्रस्तावातील पहिल्या टप्प्यात युद्ध पूर्णपणे थांबवावे तसेच, भविष्यात इराण आणि लेबनॉनविरुद्ध कोणतीही लष्करी कारवाई करू नये , हा सगळा संघर्ष पूर्णपणे थांबवावा अशी अट इराणने घातली आहे.

२. तर पहिल्या टप्प्यातील अटीवर एकमत झाल्यानंतरच, दुसऱ्या टप्प्यात जागतिक तेल पुरवठ्यासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराण त्यांचे नियंत्रण हटवण्यावर चर्चा करेल.

३. तसेच या दोन्ही टप्प्यांवर एकमत झाल्यानंतर केवळ आणि तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातच अणुसाठ्यावर वाटाघाटी करण्यास इराण तयार होईल. जो अमेरिकेसाठी सर्वात महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे.

## मंत्री नितेश राणेंना १ महिन्याचा कारावास

**अलिबाग । प्रतिनिधी**



**मंत्री नितेश राणे यांच्यासंदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. कणकवली मध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर उपअभियंता प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखलफेक प्रकरणातून नितेश राणे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. मात्र ५०४ गुन्ह्याखाली नितेश राणे यांना न्यायालयाने दोषी ठरवण्यात आलं आहे. त्यांना १ महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे आणि दुरावस्थेसाठी उपअभियंता प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखलफेक प्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयाने नितेश राणे यांच्यासह ४० जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. नितेश राणे कॉंग्रेसमध्ये असताना जुलै २०१९ मध्ये उपअभियंता प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखल फेक करण्यात आली होती. याबाबत न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. कणकवली शहरातील रस्त्यांची परिस्थिती चिखलमय झाली होती. त्यावेळी अभियंता प्रकाश शेडेकर यांना जाब विचारत शेडेकर यांच्यावर चिखलफेक आणि मारहाण करण्यात आल्याची शेडेकर यांनी तक्रार केली होती. त्या प्रकरणी नितेश राणे यांच्यावर ३५३, ३३२, ५०४, ५०६ कलमानुसार गुन्हा दाखल झाला होता. यातील ५०४ कलमाअंतर्गत सार्वजनिक ▶▶ पान २ वर

## विधान परिषदेसाठी गोऱ्हेना पक्षातूनच विरोध महाविकास आघाडीचा एकमेव उमेदवार कोण

**पुणे । प्रतिनिधी**


विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. या ९ जागांमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या आमदार नीलम गोऱ्हे यांचा देखील कार्यकाळ संपत आहे.मात्र त्यांना शिवसेनेमधूनच विरोध होत आहे दुसरीकडे महविकास आघाडीचा उमेदवार कोण याबाबद अद्याप एकमत झालेले नाही.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर पुन्हा शिवसेनेकडून कोणाला संधी मिळणार याबाबत चर्चा सुरु आहे. अशातच शिवसेना पुणे जिल्हा महिला आघाडीनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहलं आहे. यामध्येउपसभापती नीलम गोऱ्हे यांना ▶▶ पान २ वर

#### २८ मतांचा कोटा आवश्यक

विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीत भाजप (१३१ आमदार), एकनाथ शिंदे शिवसेना (५७ आमदार) आणि अजित पवार राष्ट्रवादी (४० आमदार) असे बलाबल पाहता महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ आहे. त्यामुळे त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज निवडून येऊ शकतो.

## अखेर पेटीएम पेमेंट बँकेचा परवाना रद्द





**नवी दिल्ली । वृतसंस्था**

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) पेटीएम पेमेंट बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे. या कारवाईनंतर लाखो ग्राहकांमध्ये त्यांचे जमा पैसे परत कधी मिळणार, याबाबत चिंता वाढली आहे. पेटीएम पेमेंट बँके कडून १० कोटींहून अधिक ग्राहक असल्याचा दावा केला जातो. मात्र, नियामकांच्या कारवाईनंतर बँकेच्या बंद प्रक्रियेला आता गती मिळत आहे. वन ९७ कम्यूनिकेशन्स आणि त्याचे संस्थापक विजय शेखर शर्मा ▶▶ पान २ वर

## पडळकर ‘डोनाल्ड ट्रम्प’ यांच्या लेव्हलचे–विश्वजीत कदम

**सांगली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात विधानसभेतून विजयी झालेल्या गोपीचंद पडळकर आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये नेहमीच टीका टीपण्णी होत असते.त्याच पार्श्वभूमीवर गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या टीकेला आता विश्वजीत कदम यांनी उत्तर दिलंय. कदम यांनी मिश्लीक टोला लगावत पडळकरांना पुन्हा डिवचलं आहे. त्यामुळे, विश्वजीत कदम यांच्या उत्तरावर आता गोपीचंद पडळकर काय बोलतील हेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील आणि कॉंग्रेस आमदार विश्वजीत कदम यांच्यावर टीका केली होती. सांगली लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२७ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| वस्तू | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४३.५० क्विंटल | १,९५१ | २,८५० | २,३४१ |
| ज्वारी/हायब्रिड: १६५.०० क्विंटल | १,७५१ | ४,००१ | २,३३५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,३०० | ७,००० | ६,६५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ४७.०० क्विंटल | २,२५१ | २,७०१ | २,३६४ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: १३.०० क्विंटल | ५,१५० | ५,२०७ | ५,१७८ |

## उन्हाची तीव्रता ;राज्यावर पाणीटंचाईचे सावट

### धरणांत केवळ ४३ टक्के पाणी; पुण्यातील स्थिती चिंताजनक

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात सूर्याचा पारा चढू लागला आहे. उष्णतेचे विक्रम मोडले जात असताना महाराष्ट्राच्या घशाला अक्षरश: कोरड पडण्यास सुरु झाली आहे. अनेक भागांत कोरडीठाक परिस्थिती निर्माण होत असून, भू–गर्भजल पातळी झपाट्याने खालावत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. आराखड्यातील आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी तब्बल ११ जिल्हे पाणी टंचाईच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत, तर १८ जिल्हे तीव्र पाणीटंचाईच्या गर्तेत सापडले आहेत. जलसंपदा विभागाच्या २५ एप्रिलच्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यातील ३०२८ प्रकल्पांमध्ये आता केवळ ४३.२३% उपयुक्त साठा शिल्लक आहे.**



राज्यातील तापमान ४० अंशांच्या पार गेल्याने धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. मध्यम व लघु प्रकल्पांची स्थिती तर अधिक बिकट आहे. राज्यातील १३८ मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या १२,४२३ दलघमी पाणी उपलब्ध असले तरी मेअखेरपर्यंत हे साठे तळ गाठण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षीच्या ३६.४० टक्क्यांच्या तुलनेत यंदाचा ४३.२३ टक्के साठा हा तांत्रिकदृष्ट्या दिलासादायक वाटू ▶▶ पान २ वर

#### विदर्भ, मराठवाड्यात पाण्याची कमतरता

विदर्भ, मराठवाडा या भागांमध्ये दरवर्षी भूपृष्ठाखालील पाण्याची कमतरता प्रकर्षाने जाणवत असून, सुमारे ४२.५ टक्के भूभाग ‘तुटवडा असलेला’ किंवा ‘तीव्र तुटवडा असलेला’ उपखो–यांमध्ये मोडतो. अहिल्याबाई नगर, नंदुरबार, परभणी, सोलापूर हे जिल्हे ‘गंभीर जलसंकटाचा धोका असलेला भाग’ यादीत असल्याने भविष्यातील जलसंकटाची तीव्रता अधिक अधोरेखित होते.

## जातीवाचक शब्दाचा वापर; ममता बॅनर्जीना नोटीस

**कोलकाता । वृतसंस्था**

**पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी मोठ्या संख्येनं मतदान झालं असून ९२ टक्क्यांहून अधिक मतदानाची टक्केवारील समोर आली आहे. सत्ता कोण स्थापन करणार? याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. दुसरीकडे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना प्रचारातील भाषणावेळी केलेल्या जातीवाचक वक्तव्यासंदर्भात राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडून नोटीस बजावण्यात आली आहे.**



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका सभेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी केलेल्या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला आहे. ममता बॅनर्जीनी जातीवाचक शब्दप्रयोग केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यानंतर, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडून या घटनेची दखल घेत राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. ममता बॅनर्जीनी वापरलेला शब्द हा अनुसूचित जाती समुदायासाठी अपमानजनक मानला जातो. त्यांचे वक्तव्य केवळ आपत्तीजनक नसून अनुसूचित जाती आणि अनुसूचित ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ‘लवकर येणारा मान्सून : दिलासा की नवी चिंता?’

एप्रिलच्या कडक उन्हाने हैराण झालेल्या जनतेसाठी यंदाचा मान्सून आशेचा किरण ठरताना दिसत आहे. तापमानाने चाळीशी ओलांडून अनेक ठिकाणी ४६ अंशांपर्यंत झेप घेतली असताना, पावसाच्या आगमनाच्या बातम्यांनी दिलासा दिला आहे. विशेष म्हणजे यंदा मान्सून मे अखेरीसच भारतात दाखल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हवामानातील बदलत्या घडामोडींमध्ये हा अंदाज केवळ आनंददायी नाही, तर अनेक प्रश्नही उपस्थित करणारा आहे.

युरोपियन हवामान संस्थेच्या अंदाजानुसार, १८ ते २५ मे दरम्यान अंदमान-निकोबार बेटांवर मान्सूनची चाहूल लागेल आणि त्यानंतर तो दक्षिण भारतात प्रवेश करेल. केरळमध्ये साधारण २५ मे ते १ जूनदरम्यान पावसाचे आगमन होण्याची शक्यता आहे. मागील वर्षीप्रमाणेच यंदाही मान्सून वेळेआधी दाखल होण्याची चिन्हे दिसत आहेत. उष्णतेने तापलेल्या जमिनीवर समुद्राकडून येणारे आर्द्र वारे अधिक वेगाने खेचले जात असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. तथापि, या आनंदवार्तेमागे काही चिंतेचे ढगही दाटून आले आहेत. अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सून उशिरा येईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. परंतु सध्याचे संकेत त्याला छेद देत आहेत. याचबरोबर इंडियन ओशन डायपोलही मान्सूनसाठी अनुकूल ठरत असल्याचे सांगितले जाते. मात्र हवामानातील अनिश्चितता लक्षात घेता हे सर्व अंदाज बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे उष्णतेची तीव्रता वाढत असताना दुसरीकडे हिमालयातील बर्फाचे प्रमाण लक्षणीय घटल्याची बाब अधिक गंभीर आहे. गेल्या दोन दशकांतील नीचांकी पातळी गाठलेल्या हिमसाठ्यामुळे नद्यांच्या प्रवाहावर आणि परिणामी पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती आहे. आशियातील कोट्यवधी लोकांच्या पाणी सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला आहे. त्यामुळे केवळ मान्सूनच्या आगमनावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाहता, वेळेवर किंवा लवकर येणारा मान्सून हा खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. पावसाचे योग्य वितरण झाल्यास कापूस, तांदूळ, बाजरी यांसारख्या पिकांचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. मात्र अतिवृष्टीचा अंदाजही वर्तवला जात असल्याने नुकसानाची शक्यता तितकीच गंभीर आहे. विशेषतः ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ शकते, हा इशारा दुर्लक्षित करता येणार नाही.

राज्यात सध्या ‘दुहेरी हवामान’ अनुभवायला मिळत आहे. एका बाजूला उष्णतेच्या लाटा, तर दुसरीकडे अवकाळी पावसाच्या सरी असे चित्र आहे. हवामान विभागाने काही भागात यलो अलर्ट जारी केला असून, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. या अनिश्चित वातावरणामुळे शेती नियोजन आणि दैनंदिन जीवन दोन्ही प्रभावित होत आहेत. या पार्श्वभूमीवर, लवकर येणारा मान्सून हा केवळ आनंदाचा विषय नसून सजगतेचा इशारा आहे. हवामानातील बदलत्या पॅटर्नमुळे पारंपरिक अंदाज आणि अनुभवांवर विसंबून राहणे आता पुरेसे राहिलेले नाही. आधुनिक तंत्रज्ञान, अचूक अंदाज आणि प्रभावी जलव्यवस्थापन यांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे.

शेवटी, मान्सून हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. त्याचे आगमन वेळेवर होणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्याचे संतुलित आणि नियोजित स्वरूपही आवश्यक आहे. यंदाचा मान्सून लवकर येण्याची चिन्हे दिलासा देणारी असली, तरी त्यामागील अनिश्चितता आणि संभाव्य धोके लक्षात घेता प्रशासन, शेतकरी आणि नागरिकांनी संजय राहणे ही काळाची गरज आहे.

# बीड कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिगेला; डोम उभारणीच्या कामाचे महंत योगीराज महाराजांच्या हस्ते उद्घाटन

## ६ फुटी सराडा (इगवाना) ठरणार आकर्षण

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ०१ ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड )बीड या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून शेतकऱ्यांमध्ये कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिंगेला पोहोचली आहे दि. २६ एप्रिल रविवारी रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण बीड मैदानावर डोम स्ट्रक्चरच्या कामाचा शुभारंभ रामगड संस्थानाचे मठापती महंत स्वामी योगीराज महाराज व स्वागतअध्यक्ष दिलीप गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके यांच्या शुभ हस्ते व गणेश राऊत, रमेश सानप, कैलास रकटे, बंडू जठाळ शरद गोरे , संभाजी जाधव,ॲड. गणेश कारंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला भव्य असे सहा डोम या ठिकाणी उभारण्यात येत असून या अनुषंगाने विविध कार्यक्रमाची रेलचेल चार दिवस चालणारा असून दिनांक १ मे रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे असल्याची माहिती रोजी कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी माहिती आहे.

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

या कृषी प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोफत स्टॉल दिला जाणार असून स्वतः उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योगाला मोफत स्टॉल दिला जाणार आहे जेणेकरून या आपल्या लघु उद्योगास चालना मिळावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे



आयोजन करते केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना सीड्स फर्टीलायझर डीलर इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक ,कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे ,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव,पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे ,नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे प्रसिद्धी समिती प्रमुख मंजीत शेख, सुभाष चौरे,उत्तम हजारे,गणेश सावत,संपादक संजय मालानी, संपादक कामरान शेख, संपादक जालिंदर धांडे,चर्चासत्र समितीप्रमुख जुबेर पठाण, धनंजय गुंदेकर पशुप्रदर्शन समिती डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे



बीड : जिल्हा परिषदेचे नूतन शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे यांचा सत्कार उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे यांनी सोमवारी केला. यावेळी उपशिक्षणाधिकारी मारोती जाधव, अधीक्षक रंगनाथ राऊत आदी उपस्थित होते.

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

## मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या केल्या संबंधितांना सुचना



बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध महत्वाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी वेगवेळ्या शासकीय विभागांची सोमवारी (दि.२७) रोजी आढावा बैठका घेतल्या. यामध्ये संबंधित विभागांशी निगडीत असलेले नागरिक, शेतकरी यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना संबंधित अधिकायांना केल्या.

### पुल कम बंधायाच्या कामासाठी महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा, जलसंधारण विभागांची संयुक्त बैठक

बीड शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पुल कम बंधारा कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभाग या तीन विभागांची संयुक्त बैठक झाली. पुढिल येत्या काळात पाणी टंचाई होऊ नये यासाठी लवकरात लवकर पुल कम बंधायाचे काम पुर्ण होऊन पाणी अडविण्या बाबतच्या नियोजना संदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या पावसाळ्यातच या ठिकाणी पाणी अडवून बीड शहर आणि परिसरातील गावांची पाणी पातळी वाढविण्याच्या अनुषंगाने ही बैठक महत्वपुर्ण ठरली आहे.

सोमवार (दि.२७) रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे बीड पंचायत समिती, शिरूर कासार पंचायत समिती, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न, शेतकयांचे प्रश्न, विकास कामांचा आढावा या बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि सामान्य नागरिक उपस्थित होते.

# गोंदेगाव येथील खुनातील २ आरोपी ८ तासात पकडले

जालना । प्रतिनिधी

**२७ एप्रिल रोजी रोजी पवन मच्छिद्र दराडे, रा. पानेगाव, ता. अंबड यांनी पोलीस ठाण्यात २७/०४/२०२६ रोजी देऊळगाव राजा रोडवरील गोंदेगाव शिवारातील लाईनचे पावर हाऊस येथील शेत गट क्र.२२८ मधील मारोती संस्थान यांची इनाम जमीनीच्या लिंबाच्या इ गाडाजवळ आरोपी विनोद गोपीनाथ कुटे, रा. गोंदेगांव, सोमीनाथ प्रकाश गिते, रा. देवगांव, ता. पैठाण, यांनी संगनमत करुन मयत मच्छिद्र कोंडीबा दराडे,यांना दगडाने त्यांचे तोंडावर डोक्यावर निर्दयीपणे मारुन गंभीर जखमी करुन त्यांना जिवे ठार मारले म्हणुन पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२१३/२०२६ कलम १०३ (१), ३(५) भा.न्या.सं. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



सदर गुन्हयातील पळुन गेलेल्या आरोपीतांचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बसंल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेबाबत मा. पोलीस निरीक्षक सो पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांनी पथक तयार करुन पथकास सुचना दिल्याने दिनांक २७/०४/२०२६ रोजी गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गुन्हयातील आरोपी नामे १) विनोद गोपीनाथ कुटे, रा. गोंदेगांव, ता.जि.जालना २) सोमीनाथ , ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवून सांगितले की, दिनांक २६/०४/२०२६ रोजी रात्री २०:०० ते २३:०० वाजेच्या दरम्यान मयत मच्छिद्र कोंडीबा दराडे, आरोपी विनोद कुटे व आरोपी सोमीनाथ गिते यांनी सोबत दारु पिली व दारुच्या नशेमध्ये मयत मच्छिद्र कोंडीबा दराडे याने आरोपी विनोद कुटे यास त्याच्या आईला उद्देशून अश्लिल शब्द उच्चारुन शिवीगाळ केली व गालावर चापटा मारल्यामुळे आरोपी विनोद कुटे व आरोपी सोमीनाथ गिते यांनी संगनमत करुन मयत मच्छिद्र दराडे यास दगडाने तोंडावर जबर दुखापत करुन ठार मारले व पळून गेले. त्यानंतर आरोपीच्या ताब्यातुन गुन्हा करुन पळून जाण्यासाठी वापरलेली मोटार सायकल व दोन मोबाईल असा रु.१,२०,०००/-किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार भाऊराव गायके, रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, संदीप चिंचोले, देविदास भोजने, रेणुका बांडे, कविता काकस, अशोक जाधवर सर्व स्था.गु.शा. यांनी केली आहे.

# जि.परिषदेच्या जाग्यावर अतिक्रमण अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या विविध मोक्याच्या जागेवर बेकायदेशीर कब्जा करून अतिक्रमण केल्या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याचे समजते. बीड जिल्हा परिषदेच्या भाड्याने देण्यात आलेल्या पेट्रोल पंपाच्या शेजारी बेकायदेशीर पोट भाडेकरू देण्यात आले आहेत. या प्रकारात अधिकाऱ्याची मिलीभगत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयाच्या समोर अनेक वर्षापासून अतिक्रमण करण्यात आलेले आहे. तसेच बीड शहरातील नगररोडवर असलेल्या जुन्या पंचायत समितीमध्येही अतिक्रमण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचारी निवासस्थानाच्या संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या काही अधिकाऱ्यांच्या मिलीभगत करून अतिक्रमण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान या अतिक्रमण प्रकरणी कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता यांना जिल्हा परिषद प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस देऊन तत्काळ कारवाई करण्याचे आदेशही केले आहे.

पान १ वरून...

### संघर्ष संपणार की

पुढील चर्चा यशस्वी ठरेल असे संकेत दिसत आहेत. एका अहवालानुसार, तेहरानने मध्यस्थांमार्फत वॉशिंग्टनला स्पष्ट संदेश दिला की, चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी अमेरिकेला इराणने आधीच ठरवलेल्या अटी मान्य कराव्या लागतील. ज्या तीन टप्प्यांमध्ये आहेत .या प्रस्तावावर प्रतिक्रिया देत व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या ऑलिव्हिया वेल्स यांनी 'हा एक संवेदनशील राजनैतिक विषय असून, अमेरिका प्रसारमाध्यमांच्या माध्यमांतून कोणतीही चर्चा करणान नाही' असे सांगितले. तसेच इराणने मांडलेल्या प्रस्तावातील तिसऱ्या टप्प्यावर दुमत दाखवत त्या म्हणाल्या की, 'अमेरिका केवळ अशाच करारावर एकमत दाखवेल, जो त्यांच्या नागरिकांच्या हिताला प्राधान्य देईल आणि इराणला अण्वस्त्रे मिळवण्याची कधीही परवानगी देणार नाही.अमेरिकेने त्यांच्या बाजूनी सर्वोत्तम प्रस्ताव दिला होता, तर अमेरिकेला विश्वास संपादन करण्यात अयशस्वी ठरला, असे इराणने म्हटले आहे. फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झालेल्या या संघर्षाला आता दोन महिने पूर्ण होतील. या काळात दोन्ही देशांनी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पण, अद्यापही त्यातून कोणताच ठोस निर्णय झाला नाही.

------------

### आता मराठी बोलावीच

तर मराठी भाषा बोलता येणं अनिवार्य असल्याचं प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे सरनाईक यांची आज मुंबईत रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या संघटनांसोबत चर्चा झाली. या चर्चेत मराठी शिकवण्यासाठी काय-काय उपाययोजना केल्या जातील. तसेच रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वेळ हवा असल्यास तो देण्याबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीनंतर प्रताप सरनाईक यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मराठी भाषेच्या सक्तीच्या निर्णायवर आपण ठाम असल्याचं स्पष्ट केलं. तसेच मराठी शिकण्यासाठी अमराठी चालकांना वेळ वाढवून द्यायचा का? याबाबत लवकरच भूमिका स्पष्ट करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी सक्तीच्या या निर्णयाचं महायुतीमधील इतर घटकपक्षांकडून स्वागत केलं जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाला त्यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच महायुतीचा दुसरा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही आता अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी याबाबत भूमिका मांडली आहे. त्यांना या निर्णयाचं स्वागत केलं आहे.‘‘मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. इथे येणाऱ्या प्रत्येकाने इथल्या संस्कृतीचा आणि भाषेचा आदर केलाच पाहिजे. रिक्षा-टॅक्सीचालक हा प्रवाशांशी थेट जोडलेला असतो, त्यामुळे त्याला मराठी येणे हे प्रवाशांच्या सोयीचेही आहे. यासंदर्भात टप्प्याटप्प्याने मराठीच्या सक्तीची अंमलबजावणी करायला हरकत नाही. दुसऱ्या बाजूला मराठी प्रवाशांनीही प्रवास करताना जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर करावा‘‘, असं आवाहन सुनील तटकरे यांनी केलं आहे.

--------------

### अखेर पेटीएम पेमेंट

यांनी प्रमोट केलेल्या या बँकेवर मार्च २०२२ पासूनच काही निर्बंध लागू होते. जानेवारी २०२४ मध्ये फइक ने नियमांचे पालन न केल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आणि नवीन ठेवी स्वीकारण्यावर बंदी घालण्यात आली. यामुळे ग्राहकांमध्ये घबराट वाढली आणि मोठ्या प्रमाणावर पैसे काढण्यास सुरुवात झाली.आरबीआयने स्पष्ट केले आहे की, पेटीएम पेमेंट बँकेकडे पुरेशी रक्कम उपलब्ध आहे, ज्यामुळे सर्व ग्राहकांना त्यांची जमा रक्कम परत देणे शक्य आहे. ग्राहकांच्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा करण्यात आला आहे, ज्यामुळे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही. यामुळेच, रिफंड प्रक्रियेबाबत लवकरच स्पष्ट टाइमलाइन जाहीर होण्याची शक्यता आहे.परवाना रद्द झाल्यानंतर पेटीएम पेमेंट बँकेनेही ग्राहकांना आश्वासन दिले की, बँकेकडे पुरेशी कॅश उपलब्ध असून, सर्व ग्राहकांचे पैसे परत केले जातील. दरम्यान, पेटीएम पेमेंट बँकेमध्ये ग्राहकांचे पैसे सेव्हिंग अकाउंट, करंट अकाउंट, वॉलेट बॅलन्स, प्रीपेड इन्स्ट्रुमेंट्स आणि फास्टॅगच्या स्वरुपात आहेत.

-------------

### विधान परिषदेसाठी गोऱ्हेना पक्षातूनच विरोध

पुन्हा विधान परिषदेची उमेदवारी न देण्याची मागणी पत्रातून करण्यात आली आहे. पक्ष संघटनेसाठी नीलम गोऱ्हेंनी काहीही केलं नाही, उलट महिलांचे खच्चीकरण केलंपक्ष संघटनेसाठी नीलम गोऱ्हे यांनी काही केले नसून उलट महिलांचे खच्चीकरण होईल यावर त्यांनी भर दिल्याचा आरोप या पत्रातून करण्यात आला आहे. महिलांचे चरित्र हनन करुन त्यांच्यात भांडणे लावून संघटनेचे मोठे नुकसान केले आहे. नीलम गोऱ्हे या सर्वांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा आमदार करणार असल्याचा शब्द दिला असल्याचे सांगत आहेत. नीलम गोऱ्हे यांच्या ऐवजी सामान्य शिवसैनिकाला उमेदवारी दिली तर कार्यकर्ता तुम्हाला सलाम करेल असे या पत्रात नमूद करण्यात आलं आहे. अन्यथा उध्दव ठाकरे यांच्याप्रमाणे तुम्हाला पुन्हा एकदा बाईने फसवले असे पत्रात म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात तारीख व कुणाचे नाव नसून पुणे जिल्हा शिवसेना महिला आघाडी या नावाने पत्र देण्यात आलं आहे.

**विधान परिषदेतील ९ आमदारांचा कार्यकाळ संपणार१. उद्धव ठाकरे (शिवसेना – उबाठा)**

२. नीलम गोऱ्हे (शिवसेना)३. शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी – शरद पवार गट)४. अमोल मिटकरी (राष्ट्रवादी – अजित पवार गट)५. गोपीचंद पडळकर (भाजप)६. रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप)७. राजेश राठोड (काँग्रेस)८. प्रवीण दटके (भाजप)९. रमेश कराड (भाजप)

-------------

### पडळकर ‘डोनाल्ड ट्रम्प’ यांच्या

तिकीट विकून 'इव्हेंट' केल्याचा गंभीर आरोप पडळकर यांनी केला होता. या आरोपाला पलूस-कडेगावचे आमदार विश्वजीत कदम यांनी अतिशय वेगळ्या आणि मिश्किल शैलीत उत्तर दिले आहे, ज्याची सध्या जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे. गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या टीकेबाबत विचारले असता, विश्वजीत कदम यांनी दोन्ही हात जोडून आणि चेहऱ्यावर मिश्किल हास्य आणत पडळकरांना टोला लगावला. ते म्हणाले की, ‘‘पडळकर हे खूप महान नेते आहेत. ते थेट 'डोनाल्ड ट्रम्प' यांच्या लेव्हलचे नेते आहेत. आम्ही भारतात आणि महाराष्ट्रात राहणारे छोटे लोक आहोत, त्यामुळे त्यांच्या लेव्हलला जाऊन आम्ही बोलू शकत नाही. ‘‘एकीकडे पडळकर यांनी ‘‘माझ्या भीतीपोटी हे तिघे (जयंत पाटील, विश्वजीत कदम, विशाल पाटील) एकत्र आले आहेत‘‘ आणि ‘‘यांना ज्यादा नॉलेज नाही‘‘ अशी कठोर शब्दात टीका केली असताना, विश्वजीत कदम यांनी मात्र दोन्ही हात जोडून आणि पडळकरांना थेट अमेरिकेच्या माजी अध्यक्षांची उपमा देऊन हा विषय पूर्णपणे हसण्यावारी नेला आहे.

------------

### जातीवाचक शब्दाचा

जमातीच्या अधिनियम कलम ३(१)() नुसार दंडनी अपराध आहे. याप्रकरणी, आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाना यांनी टीपण्णी केली आहे. अनुसूचित जाती आणि जमातीच्या अधिकार व सन्मानाच्या रक्षणासाठी आम्ही प्रतिबंध आहोत. कुठल्याही परिस्थितीत जातीय अपमान सहन केला जाणार नाही, असे किशोर मकवाना यांनी म्हटलं. तसेच, याप्रकरणी, आयोगाने पश्चिम बंगालचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना नोटीसही बजावली आहे. तसेच, पुढील तीन दिवसांत यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा, असेही सूचवले आहे. प. बंगालमध्ये गेल्या काही महिन्यात अनुसूचित जातींच्या विरोधात अत्याचार आणि हिंसक कारवाया वाढल्या आहेत. त्यातच, मुख्यमंत्री पदावरील व्यक्तीकडून अशारितीने जातीवाचक शब्दाचा प्रयोग करणे दुर्दैवी असल्याचंही किशोर मकवाना यांनी म्हटलं आहे.

--------------

### उन्हाची तीव्रता ;राज्यावर

शकतो. मात्र, या आकडेवारीच्या मागे एक मोठे वास्तव दडलेले आहे. यंदा उन्हाची तीव्रता अधिक असल्याने बाष्पीभवनाचा वेग गेल्या वर्षीपेक्षा २५ टक्क्यांनी जास्त आहे. त्यातच पुणे विभागातील नीचांकी साठ्यामुळे राज्यातील ‘प्रादेशिक जल-असमतोल’ स्पष्टपणे समोर आला आहे. केवळ टँकरमुक्त गावे जाहीर करण्यापेक्षा आता शहरी आणि ग्रामीण भागात पाण्याचे समन्यायी वाटप आणि काटकसरीचा वापर हेच शेवटचे शस्त्र उरले आहे.वापरात नसलेल्या नदीखो-यांतील पाणी वापरणे, सांडपाण्याचे पुनर्वापर वाढवणे, तसेच सूक्ष्म सिंचन पद्धतींचा विस्तार करणे यावर भर देण्यात आला आहे. कालव्यांमधील पाण्याचे ‘वापराच्या प्रमाणावर आधारित पाणी दर’ लागू करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे, ज्यामुळे पाण्याचा वापर नियंत्रित होऊ शकतो. याशिवाय, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जलस्रोत आणि पायाभूत सुविधांना ‘हवामानसुसंगत सुरक्षित’ करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. विशेषत: विदर्भात लहान धरणे आणि चेक डॅम उभारून पाणी साठवण क्षमता वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व उपाययोजनांसाठी तब्बल २.०७ लाख कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे राज्य कृती आराखड्यात म्हटलं आहे.

-------------

### मंत्री नितेश राणेंना १

ठिकाणी शांततेचा भंग प्रकरणी नितेश राणे यांना एक महिन्याचा कारावास व १ लाख रूपये दंड सुनावण्यात आला आहे. तर इतर सर्व गुन्ह्यांमधून नितेश राणेंसह सहकाऱ्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. आरोपींच्या वतीने त्या शिक्षेला स्थगिती मिळावी याकरिता अर्ज करण्यात आला आहे. त्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. लवकरच याबाबत उच्च न्यायालयामध्ये दाद मागणार आहेत.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

३

मंगळवार, दि.२८ एप्रिल २०२६

## थोडक्यात

### कै. चक्रधर उगले यांना बीड समता परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

बीड । प्रतिनिधी

समता परिषदेचे परभणी जिल्हाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती असे पदे भूषविलेले व सध्या पश्चिम मराठवाडा अध्यक्ष म्हणून काम करत असलेले कै. चक्रधर उगले यांना बीड येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गेली पंचवीस वर्षांपासून ते समता परिषदमध्ये सक्रिय होते.

यावेळी बोलताना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत म्हणाले की, पश्चिम मराठवाडा विभागीय अध्यक्ष चक्रधर उगले यांच्या निधनाची बातमी धक्कादायक आणि दुःखद आहे. परभणी जिल्ह्यातील सामाजिक चळवळीतील एक निष्ठावान कार्यकर्ता आणि फुले - शाहू - आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक म्हणून त्यांनी समाजहितासाठी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने समता परिषदेचे आणि बहुजन समाजाचे कधीही न भरून निघणारे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या आत्म्यास मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. याप्रसंगी त्यांच्या परिवाराच्या दुःखात समता परिषद सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच प्रार्थना.

याप्रसंगी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्यासह समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत, परीट समाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष ड. संदीप बेदरे, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे, रंजित सोन्नर, अजिंक्य सुरवसे, स्वप्नील शिंदे, सावता काळे, अजय राऊत, शरद विटकर, महेश वेवहारे, नामदेव मेत्रे, वैभव खेत्रे, ज्ञानेश्वर राऊत, सुशील चौधरी, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शुभम आखाडे यांच्यासह समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ढेकणमोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची कार्यकारिणी जाहीर





बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. गावातील सर्व समाजबांधवांच्या उपस्थितीत व सर्वानुमते ही कार्यकारिणी निश्चित करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी अरविंद शिंदे यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी दयाराज शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सचिव म्हणून दिलीप शिंदे यांची निवड केली आहे, तर वीपिन शिंदे यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली. कोषाध्यक्षपदी बाबासाहेब शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.तसेच कार्यकारिणीत, गणपत अण्णा शिंदे, नागेश शिंदे, सखाराम शिंदे, देवानंद शिंदे (ग्रामपंचायत सदस्य), विकास शिंदे, बापू शिंदे, आनंद शिंदे, अक्षय शिंदे, वसंत शिंदे, रघुनाथ शिंदे, युवराज गायकवाड, विनोद शिंदे, कृष्णा ससाने, आकाश शिंदे, अजय शिंदे, कृष्णा शिंदे, विश्वजीत शिंदे, अनिल शिंदे, संजय शिंदे, गोरख शिंदे, नवनाथ शिंदे, पोपट शिंदे, रमेश शिंदे, सुदाम शिंदे, सुनील शिंदे, विकी शिंदे, ऋषिकेश शिंदे, प्रभाकर शिंदे, महादेव शिंदे, शहादेव शिंदे, विश्वनाथ शिंदे, रामेश्वर शिंदे, प्रभाकर शिंदे किसन शिंदे, राजेंद्र साळवे, सचिन शिंदे, दत्ता शिंदे, प्रकाश शिंदे, कुंडलीक शिंदे आदी सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. बैठकीदरम्यान सर्व पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली असून, गावामध्ये यंदाची जयंती मोठ्या उत्साहात, सामाजिक एकात्मतेचा संदेश देत साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी अ.भा. किसान सभेची तहसील कार्यालयावर निदर्शने

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, माजलगाव तालुका समितीच्या वतीने दि २७ एप्रिल सोमवार रोजी तहसीलदार, माजलगाव यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या समस्या तात्काळ न सोडवल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.




भारतीय किसान सभेच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात पुढिल मागण्या करण्यात आलेल्या आहेत.त्यामध्ये २०२५ च्या खरीप पिक विमा मंजूर करा,माजलगाव तालुक्यातील २०२५ च्या खरीप पिक विमा योजनेअंतर्गत तालुका मंजूर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केलेल्या दरानुसार हेक्टरी १७५००/ रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावेत,नवीन पिक विमा योजना लागू करा,जाचक अटी असलेली सध्याची नवीन पिक विमा योजना बंद करून जुनी पिक विमा योजना तात्काळ लागू करावी,शेततळ्यांना १००% अनुदान शेतकरी व शेतकऱ्यांच्या शेतीतील उभ्या पिकांना संरक्षण देण्यासाठी शेततळ्यांना १००% अनुदानावर कुंपण द्यावे, शेतकऱ्यांचे कर्ज विना अट सरसकट माफ करावे, थकित उसाचे बिल शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावे, ईरला-येळा तांडा या दोन्ही गावातील शेतकऱ्यांमध्ये पाईपलाईनवरून चाललेला वाद मराठवाडा प्रशासनाने मध्यस्थी करून तात्काळ मिटवावा, जायकवाडी उजव्या कालव्याचे पाणी विलंबाने येते,पाण्याचे नियोजन वेळेवर करावे,छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्या बागेश्वर धामचे स्वयंघोषित संत शास्त्री व आमदार संजय गायकवाड यांच्यावर रीतसर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आल्या आहेत.किसान सभेचे तालुका सचिव कॉ.कृष्णा पांडुरंग सोळंके यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील शेतकरी अनेक समस्यांनी त्रस्त आहेत.पिक विमा, कर्जमाफी,थकित बिले यांसारख्या मागण्या शासन दरबारी वारंवार मांडूनही त्यावर कार्यवाही होत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. जर प्रशासनाने १५ दिवसांत मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही,तर तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले जाईल असा इशारा माकप चे जेष्ठ नेते कॉ. मुसद्दीक बाबा व किसान सभा तालुका अध्यक्ष कॉ.कृष्णा सोळंके यांनी दिला आहे.यावेळी किसान सभेचे कॉ. ॲड. अशोक साबळे, कॉ.शिवाजी कुरे, कॉ.अशोक डाके, कॉ.रामचंद्र चिंचाणे,कॉ.राम सोळंके,कॉ.गणेश कदम,कॉ.परमेश्वर कदम,कॉ अरुण गरड,दत्ता बादाडे, विकास थेटे,केशव पवार,रावसाहेब बेद्रे,लेंगुळे इत्यादी शेतकरी व किसान सभेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुसळंबच्या खंडोबाच्या भंडाऱ्याची वर्षानुवर्षांची प्रथा मोडकळीला!

### २० वर्षांची बिनविरोधची परंपरा विकृत राजकारणामुळे मोडली

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आदर्श गाव कुसळंब हे जागृत देवस्थान खंडोबाच्या भंडाऱ्यावर चालत आले आहे. खंडोबाचा भंडारा हा गावकऱ्यांसाठी महत्त्वाचा आहे. मंदिरात एखादी गोष्ट ठरली तर ती भंडाऱ्याची अस्मिता म्हणून जपली जाते आणि ती अखंड अविरतपणे वीस वर्षापासून जोपासत आहेत पण सध्या विकृत राजकारणामुळे कुसळंब गाव व भंडाऱ्याची अस्मिता विखुरताना दिसत आहे.



खंडोबाच्या भंडाऱ्याची अस्मिता कोण खराब करण्याचा प्रयत्न करत आहे हे सध्या बीड जिल्ह्यामध्ये चर्चेचा विषय बनला आहे. खंडोबाच्या भंडाऱ्यावर चालणारा गाव अचानक विकृत राजकारणावर चालू लागलं की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मग सर्वसामान्य साठी खंडोबाचा भंडारा आणि राजकारण्यांसाठी तोच पिवळा भंडारा पांढरा झाला की काय ? असे प्रश्न फक्त कुसळंबच नव्हे तर बीड जिल्ह्यातील जनतेच्या मनात उपस्थित होत आहेत. भंडाऱ्याची अस्मिता खराब करू नका राजकारणामुळे देवाचा भंडारा पांढरा करू नका अशा भावना खंडोबावर श्रद्धा असणाऱ्या भाविकांमध्ये आणि कुसळंबकडे पाहून आदर्श गावाची वाटचाल करणाऱ्या नागरिकांच्या भक्तांच्या भावना ऐकायला मिळत आहेत..

विकृत राजकारणामुळे खंडोबाचा पिवळा भंडारा झाला पांढरा ?

कुसळंब हे खंडोबाच्या भंडाऱ्यावर चालणार गाव आहे. मग अचानक वीस वर्षांची बिनविरोध परंपरा मोडकळीला आणून भंडाऱ्याचा अपमान कोण करू पाहत आहे. राजकारणामुळे भंडारा पांढरा करू नका अशाच भावना नागरिकांमधून व भक्तांमधून व्यक्त होत आहेत..

खंडोबाचा भंडारा आणि गावचा विकास कोणाला नकोय ?

बीड जिल्ह्यामध्ये कुसळंब गावचं मोठं नाव आहे ते फक्त भंडाऱ्यामुळे, भंडाऱ्यामुळे एकोप्यानं नांदणार गाव विकासाच्या दृष्टीने पुढे चाललेलं गाव आज विखुरलं जात आहे. खंडोबाचा भंडारा आणि विकास कोणाला नको आहे हा प्रश्न सध्या चर्चेचा विषय बनला आहे.

## पान ६ वरुन...

### डॉ.ओमप्रकाश शेटे यांना

यशवंतराव चव्हाण ज्ञानप्रबोधिनी येथे होणार आहे. यापूर्वीही डॉ.शेटे यांना अनेक पुरस्कार प्राप्त असून या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने त्यांच्या सत्कार्यात भर पडणार आहे.

ही तर आरोग्य सेवेची पावती

सरपंच परिषदेच्या राज्य कार्यकारणीने आदर्श समाजसेवा पुरस्कार जाहीर केला ही माझ्यासाठी अगदी सुखद बाब आहे. मात्र माझ्यासाठी हा केवळ सन्मान नसून राज्यातील लाखो सरपंचांकडून मिळालेली आरोग्य सेवेची पावती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी माझ्यावर टाकलेला विश्वास व जबाबदारी समर्थपणे पार पाडत असताना अशा पुरस्काराने शंभर हत्तीचे बळ मिळते व आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते.

- डॉ.ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)

### माजलगावात 'गो सम्मान

संतप्त नागरिकांनी कडक भूमिका घेत,ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंश हत्या होईल त्या ठाण्याच्या पोलीस निरीक्षकाला निलंबित करावे, तसेच कत्तलखान्यासाठी गोवंश विकणाऱ्या शेतकऱ्यांवरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे.दरम्यान, २७ एप्रिल सोमवार रोजी माजलगाव येथे 'गो सम्मान आह्वान अभियान' अंतर्गत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले.छत्रपती संभाजी महाराज चौक येथून रॅलीची सुरुवात झाली. हातात फलक, बॅनर घेऊन गो माता राष्ट्र माता अशा घोषणा देत युवक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.रॅली तहसिल कार्यालयात पोहोचल्यावर तहसिलदारांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात देशभर गोहत्येवर कठोर बंदी लागू करावी आणि गोमातेला राष्ट्रीय सन्मानाचा दर्जा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनामुळे माजलगाव शहरात जनजागृती वाढल्याचे दिसून आले असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास जिल्हाभर मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### शिवद्रोहींवर कारवाईची मागणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संबंधित वक्तव्य झाले असल्याने, ही अवमानना सरकार प्रायोजित आहे का? असा सवाल शिवप्रेमींनी उपस्थित केला.संबंधित प्रकरणात कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती व राज्यपाल यांना पाठविण्यात आले.नागपूर येथे भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यास कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्यावरून राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. संबंधित वक्तव्य ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करणारे असून शिवरायांचा अवमान करणारे आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, गणेश मस्के,माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक,रामधन जमाले,शेख मुबीन,बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, प्रा.डी.जी.तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ ,प्रविण पालीमकर,अशोक ढोले,शिवाजी हिंदोळे

आदी सहभागी झाले होते.दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांची वारंवार बदनामी होत असताना शासन निष्क्रिय का? असा सवाल उपस्थित करत ही बदनामी सरकार प्रायोजित आहे का? असा थेट प्रश्न डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आणि सरकारचा निषेध नोंदविला.

### बीडमध्ये बालविवाहाविरोधात

करण्यात आला आहे.

केज आणि सोनगावमध्येही कारवाई

दहीफळच्या कारवाईनंतर त्याच दिवशी दुपारी केज तालुक्यातील जोला येथेही एका बालविवाहावर पोलिसांनी छापा टाकला. तेथे नवरदेव श्रीकांत जाधव आणि त्याच्या नातेवाईकांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तसेच, यापूर्वी १८ एप्रिल रोजी सोनगाव (ता. जि. बीड) येथील एका १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मागील चार महिन्यांत सात गुन्हे दाखल

बीड एएचटीयू पथकाने दिलेल्या माहितीनुसार, मागील चार महिन्यांत जिल्ह्यात बालविवाहाचे एकूण सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पीडित मुलींचे समुपदेशन करून त्यांना पुढील काळजी आणि संरक्षणासाठी बालकल्याण समितीसमोर हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून नागरिकांनी अशा प्रकारच्या घटनांची माहिती पोलिसांना द्यावी. बालविवाह रोखण्यासाठी आमचे पथक सदैव सतर्क आहे.

- एएचटीयू पथक, बीड

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव, मीरा रेडेकर, उषा चौरे, शोभा जाधव, प्रदीप येवले, अशोक शिंदे व पथकाने यशस्वी केली.

## मुर्तीमंत ज्ञान हेच ज्ञानेश्वर महाराजांचे स्वरूप आहे- डॉ.विक्रम महाराज सारूक

बीड । प्रतिनिधी

मनुष्य त्याला संसारातुन बाहेर पडण्याकरीता कर्म, उपासना,योग व ज्ञान हि चार साधने आहेत पण ज्ञानानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवणे मनुष्य जन्माचे आणि कर्तव्य आहे. ज्ञान हाच देव आहे. असे सार्थ नाव ज्ञानेश्वराचे आहे. म्हणजेच मुर्तिमंत ज्ञान हेच ज्ञानेश्वर महाराजांचे स्वरूप आहे असे प्रतिपादन ह भ प डॉ विक्रम महाराज सारूक यांनी दि.१९-४-२०२६ शनिवार रोजी बीड येथील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे संत भगवानबाबा, संत वामनभाऊ, संत तुकाराम महाराज, विठ्ठल -रूख्मिणी, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ राजेंद्र भाऊ सानप यांच्या आयोजनातुन सुरू असलेल्या वर्ष १४ व्या त्रिद्वीशीय हरिनाम सप्ताहात पहिले किर्तन पुष्प गुंफताना. संत तुकाराम महाराजांच्या ज्ञानियांचा राजा गुरू महाराव! म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे !१!या अभंगातुन ज्ञानेश्वर महाराजांचे वर्णन करताना अभंगांचे निरूपण करताना प्रतिपादन केले.पुढे बोलताना डॉ सारूक महाराज म्हणाले ज्ञानेश्वर महाराज हे साधकांना मोक्ष दाय आहेत. म्हणुन सर्व संतांनी त्यांचे वर्णन केलेले आहे व सर्व संत त्यांच्याकडे जातात म्हणजे ज्ञानेश्वरांचे नाव ज्ञानदेव हे सार्थ आहे. ज्ञानदेव म्हणजे ज्ञान व देव असा अर्थ आहे.त्यांच्याकडे जे ज्ञान आहे ते ज्ञाना ज्ञानातील शुद्ध ज्ञान आहे.अज्ञानाचा लवलेश नाही ज्ञानाचे देव ते ज्ञानदेव व तेवारकऱ्यांचे देव आहेत.भक्त देवाजवळ राहतात तसे ज्ञान हे यांचे जवळ राहते. म्हणुन तर त्यांचे ज्ञान रेड्याच्या मुखात आले.मुर्तिमंत ज्ञान हे त्यांचे स्वरूप आहे. ते ज्ञान हेच देव आहे.त्यांची संगती वाचन केले तर मन पवित्र होते.परिसर पवित्र होतो विकल्प राहत नाहीत.असे संस्कार लहान मुलांना ही द्यावेत.त्यातुन ज्ञान मिळुन जीवनमान कृतार्थ होईल.श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली १४ वर्ष अखंडपणे ज्ञान सोहळा आयोजीत करण्यात येतो या बद्दल आयोजक डॉ राजेंद्र भाऊ सानप व त्यांचे सहकारी यांचे खुप खुप कौतुक असे

ह भ प डॉ विक्रम महाराज सारूक यांनी किर्तन प्रसंगी म्हटले.या किर्तनास गायक म्हणून श्रीराम सानप, किशनराव माने, नामदेव मुंडे,श्रीहर्ष धांडे, वैभव येडे,आश्रुबा सानप,पवन ढाकणे,विजय वीर, राजेंद्र घोलप यांच्या सह मृदंगाचार्य अक्षय म घोलप यांनी साथ संगत केली यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप,ह भ प दतायत्र महाराज मिसाळ, ह भ प मोहन महाराज खरमाटे, ह भ प रामहरी रसाळ गुरूजी,ह भ प बाबुराव मुंडे,एम डी पांचाळ गुरुजी,नागरगोजेसर, दतायत्र बांगर, आर के भोंडवे,ग मा शहाणे,किशोर नागरे, वाय एस भोंडवे,धनंजय सानप, उमाकांत तिडके, निलेश खेडकर,आश्रुबा नागरगोजे सह मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## ईश्वर मानायचा नाही तर दर्शनचा विषय आहे - सुश्री वैष्णवी भारतीजी

### गेवराईत श्रीमद् भागवत कथेस भक्तिमय वातावरण उत्साहात प्रारंभ

गेवराई । प्रतिनिधी

आज समाजात क्लेशाची, तणावाची आणि असंतोषाची भावना वाढत चाललेली आहे. प्रत्येकाला आत्मिक समाधान आणि आध्यात्मिक शक्तीची गरज आहे. तरी प्रत्येकाने परिवारासह श्रीमद् भागवत कथेत आले पाहिजे. येथे भगवंताची प्रचिती येवून आपल्यातील शक्ती जागृत होते. तसेच प्रत्येकाच्या शरिरातच ईश्वर आहे. आपल्या अंतर्यामी डोकावून पाहिल्यास त्या चैतन्याचा अनुभव घेता येतो. त्यांची या दिव्य कथेतून अनुभूती घ्या तसेच ईश्वर मानायचा नाही तर जाणायचा अन् दर्शनचा विषय आहे असे प्रतिपादन सुश्री वैष्णवी भारतीजी यांनी केले.



दिव्य ज्योति जाग्रती संस्थान, शाखा-पाथर्डी व्दारा गेवराई शहरातील दसरा मैदान, बीड रोड, गेवराई येथे श्रीमद् भागवत कथेचे दि.२६ एप्रिल ते ०२ मे दरम्यान सायं.४.३० ते रात्री ८.३० या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान पहिल्या दिवशी कथेप्रसंगी सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या शिष्या कथा व्यास सुश्री वैष्णवी भारतीजी बोलत होत्या. रविवारी येथील दसरा मैदानावर श्रीमद् भागवत कथेस भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण उत्साहात प्रारंभ झाला. यावेळी महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती तर भक्तगण मंडळींनी श्रीमद् भागवत कथेस बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शुक्रवार रोजी कृष्णा महाराज राऊत यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील नवव्या पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. स्वरभुषण कृष्णा महाराज राऊत बेलगावकर ता.गेवराई जि.बीड यांचे शुक्रवार दिनांक १ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व जुजगव्हाण ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.



## रायमोहच्या चौकामध्ये ग्राहकांची आर्थिक लूट

### लोकसेवा हॉटेलमध्ये बाहेर गावच्या ग्राहकांना मालाची चढ्याभावाने विक्री

शिरूर । प्रतिनिधी

बीड -अहिल्यानगर हायवे वरिल राहमोह येथील चौकामधील हॉटेल धारकांकडून बाहेर गावच्या ग्राहकांकडून महागाई झाल्याच्या नावाखाली अतिरिक्त भावाने विक्री करून ग्राहकांची आर्थिक लूट करण्याचे काम मोठ्या जोमाने सुरु आहे. चौकातील लोकसेवा हॉटेल मध्ये तर अतिरिक्त पैसे देण्यासाठी दमदाटी करण्याचे प्रकार पाहायला मिळत आहे.

शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथील रविवारी आठवडी बाजार होता. रविवार दि. २६ एप्रिल रोजी मोठी लग्न तिथी असल्याने याच चौकातील मातोश्री मंगल कार्यलयात पाडळी येथील भागवत इंगळे यांच्या मुलीचा विवाह सोहळा पार पडला आहे. तर लग्न तिथी मोठी असल्याने या महामार्गांवरून वाहतूक रहदारी ही मोठ्या प्रमाणात रविवारी दिसून येत होती.याचाच फायदा घेण्यासाठी राहमोह येथील हॉटेल व्यवसायिक ग्राहकांना लुटण्यासाठी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.रविवारी उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला होता यामुळे अंगाची लाही-लाही होत होती. यामुळे साहजिकच लोकांना पाणी बॉटल, शीत पेय, ज्यूस या सारखी पेय पिण्याकडे भर द्यावा लागला. ही संधी पाहुन रायमोह चौकातील हॉटेल धारकांनी येरवी १० रुपयाला विकली जाणारी नॉन ब्रॅण्ड पाणी बॉटल २० रुपये प्रमाणे विक्री ग्राहकांची दिवस भर आर्थिक लूट केली आहे. या चौकातील लोकसेवा हॉटेल धारकांनी तर ग्राहकांना कडून ७ रुपयाचा चहा १० रुपयाला व १० रुपयाची पाणी बॉटल २० प्रमाणे ग्राहकाकडून हुज्जत घालून ग्राहकांची दिवसभर लूट केली जात आहे.याकडे प्रशासनाने व ग्रामपंचायतने लक्ष घालण्याची गरज आहे अन्यथा आशा अतिरिक्त ग्राहक लुटीमुळे येथील मार्केटला फटका बसू शकतो याची व्यापारी संघटनेने ही दखल घेणे गरजेचे आहे.



# शेतीसाठी अधिकृत रस्ता असतांना दुसऱ्या रस्त्याची मागणी करण्यावर चाप

## उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यावरही होणार कारवाई

पुणे : शेतजमिनीला जाण्यासाठी पूर्वीचा अधिकृत रस्ता उपलब्ध असताना केवळ सोयीसाठी किंवा अंतर कमी करण्यासाठी दुसऱ्या रस्त्याची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना आता चाप बसणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ अंतर्गत नवीन रस्ता मंजूर करताना, जर आधीच पर्यायी रस्ता अस्तित्वात असेल, तर दुसरा रस्ता देण्यास राज्य सरकारने प्रतिबंध केला आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. एखाद्या शेतकऱ्याला योग्य रस्ता असतानाही केवळ वैयक्तिक फायद्यासाठी दुसऱ्या रस्त्याची मागणी केली जाते, अशी मागणी फेटाळली पाहिजे, असा मुद्दा आमदारांनी मांडला होता. त्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दुहेरी रस्त्याबाबत आदेश काढले जातील, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार महसूल विभागाने हे परिपत्रक काढण्यात आले आहे. कलम १४३ चा मुख्य उद्देश जमिनीला योग्य व वाजवी प्रवेश उपलब्ध करून देणे हा आहे. जर शेतकऱ्याच्या शेतात जाण्यासाठी आधीच एखादा रस्ता अस्तित्वात असेल. केवळ अधिक सोयीसाठी किंवा कमी अंतराचा रस्ता हवा असल्यास किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नवीन रस्ता मिळणार नाही.



अन्यथा शिस्तभंग कारवाई : कोणत्याही शेत रस्त्याची मागणी आल्यावर तहसीलदारांना केवळ कागदपत्रांवर विसंबून न राहता, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी लागणार आहे. पाहणी दरम्यान जर पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे दिसून आले, तर नवीन रस्त्याची मागणी तत्काळ फेटाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

परिपत्रकातील सूचनांचे पालन न झाल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे महसूल-वन विभागाचे कार्यासन अधिकारी प्रतापसिंह खरात यांनी परिपत्रक काढले आहे.

# उन्हाळ्यात पिकांसाठी आच्छादन ठरते फायदेशीर


पिकांच्या वाढीसाठी माती आणि त्यातील ओलावा या दोन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. जमिनी सतत सूर्यप्रकाशामध्ये राहिल्यास मातीतील ओलाव्याचे अधिक दराने बाष्पीभवन होते. पर्यायाने पिकांच्या वाढीसाठी सिंचनाचे प्रमाण वाढवावे लागते. मात्र ऐन उन्हाळ्यामध्ये मुळात पाण्याची कमतरता असताना सिंचन देणे अनेक शेतकऱ्यांना शक्य होत नाही. अशा स्थितीत पिकाचे उत्पादन घटते. हे टाळण्यासाठी विविध प्रकारच्या आच्छादनाचा वापर करणे गरजेचे आहे. जमिनीवर विविध प्रकारच्या पदार्थांचा वापर करून जमीन झाकणे, याला आच्छादन (मल्चिंग) असे म्हणतात. त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासोबतच तणांच्या वाढीला अटकाव केला जातो. सावली आणि ओलावा मिळाल्याने जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. ते अधिक क्रियाशील राहिल्याने पिकांना आवश्यक ती अन्नद्रव्ये उपलब्ध होण्यास मदत होते.

सेंद्रिय आच्छादन : गवत व पेंढा - गवते किंवा त्याचा पेंढा जमिनीवर पिकाच्या दोन ओळीमध्ये, फळबागेमध्ये झाडांच्या भोवती पसरला जातो. कंपोस्ट - कंपोस्ट खते देताना ती जमिनीवर पसरून आच्छादन होईल, अशा प्रकारे द्यावीत. होतेच परंतु त्याचबरोबर मातीची सुपीकता व रचना सुधारण्यास मदत होते. लाकडाचा भुसा व साल - लाकडाचा भुस्सा व साली या सावकाश कुजतात. त्यांचा वापर आच्छादनासाठी केल्यास मातीचे भौतिक गुणधर्म सुधारण्यास मदत होते. गवताचे तुकडे - वाळलेल्या गवताच्या तुकड्यांमुळे आच्छादन तयार होते. हे पदार्थ वेगाने कुजतात. त्यातून जमिनीत सेंद्रिय पदार्थांची वाढ होते. झाडाचा पालापाचोळा - फळबागेमध्ये होत असलेली पानगळ किंवा अन्य झाडांची वाळलेली पाने, पालापाचोळा जमिनीवर विखरून टाकल्यास त्याचे आच्छादन होते.असेंद्रिय किंवा अजैविक आच्छादन : आच्छादनामध्ये विविध खडक, प्लॅस्टिक पेपर, रबर फॅब्रिकपासून बनलेल्या पदार्थांचा वापर केला जातो. हे असेंद्रिय पदार्थ लवकर कुजत नाहीत. त्यामुळे वारंवार बदलण्याची गरज भासत नाही. अलीकडे अजैविक आच्छादनामध्ये प्लॅस्टिक पॉलिथिन पेपरचा वापर वाढत आहे. यामध्ये विविध रंग, जाडीचे पॉलिथिन शीट उपलब्ध होत आहेत.



# भारतातील ५ लोकप्रिय लिचीच्या जाती; उत्पादन मिळते चांगले

जवळजवळ प्रत्येकाला लिची खायला आवडते, हे एक रसाळ तसेच स्वादिष्ट फळ आहे. या फळाची लागवड प्रामुख्याने भारत, चीन, बांगलादेश, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांमध्ये केली जाते. पण देशात लिचीचे सर्वाधिक उत्पादन बिहारमध्ये होते. याशिवाय लिचीच्या बेदाणा जातीचे फळ अंडाकृती किंवा हृदयाच्या आकाराचे असते. बिहारमधील बहुतांश शेतकरी लिचीच्या लागवडीवर अवलंबून आहेत.



शाही लिची :बिहारची शाही लिची ही देशातील सर्वात लोकप्रिय लिचींपैकी एक आहे, त्याची लागवड प्रामुख्याने मुझफ्फरपूरमध्ये केली जाते. देशाच्या इतर भागातही शेतकरी या नावाने शेती करतात, पण मुझफ्फरपूर हे शाही लिचीच्या चांगल्या दर्जासाठी ओळखले जाते. या लिचीचा दर्जा लक्षात घेऊन तिला जीआय टॅगही देण्यात आला आहे.

चायना लिची : लिचीची चायना जात ही उशिरा पिकणारी जात असून तिचा रंग गडद लाल असतो आणि फळाचा आकारही मध्यम असतो. या जातीच्या लिचीच्या फळामध्ये लगदाचे प्रमाण जास्त असते आणि प्रत्येक झाड सुमारे ८० ते ९० किलो उत्पादन देते. या लिचीचे वैशिष्ट्य म्हणजे याचे फळ पूर्ण पिकल्यानंतरही फुटत नाही.

कसबा लिची : कसबा लिची ही बिहारमध्ये पिकणारी मध्य-उशीरा पिकणारी जात आहे. त्याची फळे गडद लाल रंगाची आणि अंडाकृती किंवा गोल असतात. मुझफ्फरपूरची लाँगिया लिची ही जात तडतडण्यास आणि सूर्यप्रकाशास प्रतिरोधक आहे. २५-३० वर्षांपूर्वीपर्यंत शाही आणि चायना लिचीसोबतच बागांमध्ये लोंग्याचेही पीक घेतले जात होते, परंतु आता ते नाहीसे झाले आहे.

बेदाणा लिची : या जातीच्या लिचीचा आकार अंडाकृती किंवा हृदयासारखा असतो, पिकल्यानंतर त्याचा रंग हलका हिरवा तसेच लाल होतो. बेदाणा लिचीचा आकार मध्यम असतो, एका फळाचे वजन १५ ते १८ ग्रॅम असते. या लिचीचा गोड चव आणि रसाळपणासाठी बिहारमधील लोकप्रिय लिची जातींमध्ये समावेश केला जातो.

पूर्व लिची : बिहारच्या पूर्व भागात लिचीच्या या जातीचे पीक घेतले जाते. पूर्वेकडील लिची फळाचा आकार मध्यम व मोठा असतो. या जातीची लिची पिकण्याची वेळ मे अखेरीस किंवा जूनचा पहिला आठवडा मानली जाते. बिहारच्या या पूर्वेकडील लिचीचा रंग गुलाबी आहे. शेतकऱ्यांना एका झाडापासून सुमारे ९० ते १०० किलो उत्पादन मिळू शकते.

# हवामान बदल आणि शेततळे

वातावरणामध्ये होत असलेला बदल आणि पिकांवर होणारा त्याचा परिणाम हे काही नवीन नाही. हवामान बदल ही काही एका दिवसात किंवा वर्षांमध्ये होणारी घटना नाही. वर्षानुवर्षे होणारी वृक्षतोड, औद्योगीकरण/शहरीकरण, मोठ्या प्रमाणात होणारे कार्बन उत्सर्जन इत्यादींचा हा परिणाम आहे. आजच्या परिस्थितीत नुसते कारणे माहीत असून चालत नाही तर त्यामुळे होणाऱ्या परिणाम सुद्धा माहित असणे आवश्यक आहे.

हवामान बदलामुळे होणारे परिणाम :हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांमध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्जन्याची अनियमितता. मान्सून हा जून मध्ये येऊन ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत राहायचा, पण आता तो जुलै ऑगस्ट महिन्यापासून वर्णी देतो. त्यामुळे पिकावर सुद्धा त्याचा परिणाम होऊ लागला आहे. पेरणी जून मध्ये होऊन सुद्धा पाण्याची असलेली कमतरता यामुळे पिके जळून जाऊ लागली आहेत. परिणामी त्यांचे उत्पन्न घटले. अशावेळी पाण्याची कमतरता/गरज पूर्ण करण्यासाठी शेततळे हा एक उत्तम उपाय आहे.

शेततळे आणि उपयोग :पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखता व साठवता येते. कोरड्या हंगामात आवश्यकतेनुसार विश्वसनीय जलस्रोत म्हणून कामी येतो. दुष्काळी भागात पाणीटंचाईच्या विरोधात आशेचा किरण म्हणून काम करते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लावते. सातत्यपूर्ण उत्पादन राखण्यास मदत होते. जमिनीचे आरोग्य व उत्पन्नात सुधारणा होते. पिकांमध्ये विविधता येते. पशुधन वाढी करता उपयोग होतो. मत्स्यपालन आणि सिंचन अशी दुहेरी उत्पादने घेता येतात.



शेततळ्यासाठी आवश्यक जागेचे निकष :शेततळे खोदण्यासाठी जागेची निवड खूप महत्त्वाची आहे म्हणून शेततळे घेण्यापूर्वी शेतकऱ्यांनी खालील निकषांचा विचार करणे गरजेचे आहे. ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमीन असलेल्या जागेची निवड करावी. काळी जमीन ज्यात चिकन मातीचे प्रमाण जास्त आहे, अशी माती चांगली असते. मुरमाड, वालुकामय सच्छिद्र खडक असलेल्या जमिनीची निवड करू नये.

जमिनीचा उतार तीन टक्क्यांपेक्षा कमी असावा. नाल्याच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येऊ नये. शेततळ्याची पाणी साठवण क्षमता पाणलोट क्षेत्रातून वाहून येणाऱ्या पाणी क्षमते पेक्षा जास्त असावी. ज्यावेळी शेतातून किंवा शेताजवळून नाला वाहत आहे आणि नाल्याचा उतार तीन ते पाच टक्क्यापर्यंत आहे. तेव्हा नाल्यातील प्रवाहाला काटकोनात बांधून शेततळे तयार करता येते. तसेच शेतात मध्यभागी किंवा एक बाजूला खोलगट जागा असेल, तर खड्डा खोदून शेततळे तयार करता येते.

शेततळे तयार करताना शेततळ्याची जागा निवडणे व त्याचा आकार ठरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेततळ्यात वाहून येणारे पाणी जास्त दिवस थांबावे या दृष्टीने पाण्याचा पाझर कमी असलेल्या चिबड जमिनीत शेततळे घ्यावे. अन्यथा माती किंवा पॉलिथिनचे अच्छादन वापरून पाझर कमी करता येईल अशी जमीन निवडावी. त्याचबरोबर साठविलेल्या पाण्याचा वापर सोयीस्कर करता येईल असे ठिकाण निवडावे. शेततळ्याचा आकार ठरवितांना शेततळ्यात वाहून येऊ शकणारा अपधाव, बाष्पीभवनाद्वारे आणि पाझरामुळे होणारा व्यय आणि आपल्याला आवश्यक असणारे पाणी या सर्व बाबींचा ताळमेळ घालून मगच निर्णय घ्यावा.

शेततळे आणि त्याचे प्रकार :शेततळ्याचे आकारमान हे लांबी रुंदी उंची या सूत्राद्वारे काढले जाते. आकारमानानुसार विचार करता शेततळे व त्याचे विविध प्रकार पडतात.

तटबंधी असलेले शेततळे :अश्या प्रकारची शेततळे हि अपधावेच्या विरुद्ध दिशेला बांधून त्याला तटबंधी करतात. तसेच ह्याचे आकारमान, साठवण क्षमतेच्या गरजेवर ठरवतात. सौम्य व माध्यम उतार अश्या प्रकारच्या शेततळ्यासाठी योग्य असतो. अशा प्रकारचे शेततळे आकृती क्रमांक एक मध्ये दाखविल्याप्रमाणे असते.

खोदलेले शेततळे :ह्या प्रकारच्या शेततळ्याना योग्य प्रकारचा आकार असतो म्हणजे, आयताकार, चौकोनी इत्यादी. पाणी आत येण्यासाठी इनलेट व पाणी बाहेर काढण्यासाठी आउटलेट असते. याचे बांधकाम करण्यासाठी, माती जमिनीमधून खोदून काढतात आणि तीच माती तटबंधी बनवण्यासाठी वापरतात. याची उंची व आकार आवश्यक पाण्याच्या साठवण क्षमतेवर अवलंबून असते.

डग आउट शेततळे :सौम्य उतार असलेली जमीन अशाप्रकारच्या शेततळ्यासाठी योग्य असते. उतार ज्या दिशेला असतो त्या दिशेला ह्याचे बांधकाम करता. अशा प्रकारचे शेततळे आकृती क्रमांक २ (अ) मध्ये दाखविल्याप्रमाणे असते.

सरफेस शेततळे : जेव्हा अपधाव शेतामधून वाहत जाऊन एखाद्या खड्ड्यामध्ये साठतो त्याला सरफेस पॉन्ड म्हणतात. ह्याची खोदण्यासाठी लागणारी उंची कमी कमी असते. चढउताराची जमीन ह्या साठी योग्य असते. याला इनलेट नसले तरी चालते पण आउटलेट असणे आवश्यक आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१६ : आयरिश भारतीय क्रांतिकारक डॉ. एनी बेसेन्ट यांनी ब्रिटीशकालीन भारतात होमरूल चळवळीची स्थापना केली.
१९२० : होमरुल लीगच्या अध्यक्षपदी महात्मा गांधी यांची निवड.
१९२० : अझरबैजानचा सो होम रुविएत युनियनमधे समावेश झाला.
१९३५ : रुसची राजधानी मास्को येथे भूमिगत रेल्वे 'मेट्रो' सुरू करण्यात आली.
१९६९ : चार्ल्स द गॉलने फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
२००१ : डेनिस टिटो हा पैसे देउन अंतराळात प्रवास करणारा पहिला अंतराळ प्रवासी झाला.
२००२ : राष्ट्रकुल(कॉमनवेल्थ) किंवा आयरिश नागरिकांद्वारे लिखित इंग्रजी भाषिक लिखित कादंबरी आणि युनाइटेड किंगडममध्ये प्रकाशित होणाऱ्या सर्वोत्कृष्ट मूळ कादंबरीसाठी दरवर्षी देण्यात येणारा 'मैन बुकर पुरस्कार' (साहित्यिक पुरस्कार) चे नाव बदलून ''मैन प्राइज फॉर फिक्शन'' असे करण्यात आले.
२००३ : ऍपल कम्प्यूटर इन्क. ने आयट्यून्स स्टोअर प्रकाशित केले.
२००८ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने 'पीएसएलव्ही-सी ९' या उपग्रहाचे प्रक्षेपण करून नवीन इतिहास रचला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५८ : जेम्स मोन्रो अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ४ जुलै १८३१)
१७९१ : शीख साम्राज्य शासक महाराजा रणजितसिंग यांच्या खालसा सेनेचे सेनापती हरीसिंह नलवा यांचा जन्मदिन.
१८५४ : वासुदेव गणेश तथा वासुकाका जोशी लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, चित्रशाळेचे विश्वस्त (मृत्यू: १२ जानेवारी १९४४)
१८५६ : वासुकाका जोशी या नावाने प्रसिद्ध असलेले भारतीय स्वातंत्र्य सेनानी, तसचं, लोकमान्य टिळक यांचे निकटवर्तीय व चित्रशाळेचे विश्वस्त वासुदेव गणेश जोशी यांचे निधन.
१९०८ : ऑस्ट्रियाचे व्यापारी व नाझीविरोधी ऑस्कार शिंडलर यांचा जन्म.
१९१६ : प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स कार लॅम्बोर्गिनी चे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचा इटली येथे जन्म. (मृत्यू: २० फेब्रुवारी १९९३)
१९२९ : भारतीय चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध वेशभूषाकार भानू अथैया यांचा जन्मदिन.
१९३१ : मधु मंगेश कर्णिक, मराठी कथाकार, कादंबरीकार, कवी, संवादलेखक.
१९३७ : सद्दाम हुसेन इराकी हुकूमशहा व इराकचे ५ वे अध्यक्ष (मृत्यू: ३० डिसेंबर २००६)
१९४२ : माईक ब्रेअर्ली इंग्लिश क्रिकेटर
१९६८ : अँडी फ्लॉवर झिम्बाब्वेचा क्रिकेटपटू
१९७१ : एम्मे एंटरटेनमेंट या मोशन पिक्चर प्रॉडक्शन कंपनीचे सह-संस्थापक व सेव्ह द टाईगर या संस्थेचे सल्लागार निकील अडवाणी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२६ : थॉमस पिट, चेन्नईचा ब्रिटीश गव्हर्नर.
१७४० : थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बाजीराव बल्लाळ बाळाजी भट यांचे नर्मदातीरी रावेरखेडी या ठिकाणी निधन झाले. (जन्म: १८ ऑगस्ट १७००)
१७४० : महाराजा छत्रसाल यांची कन्या आणि मराठा शासक पेशवा बाजीराव प्रथम यांची दुसऱ्या पत्नी मस्तानी यांचे निधन.
१९०३ : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये आपले महत्वपूर्ण योगदान देणारे अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जोशिया विलार्ड गिब्स यांचे निधन.
१९४५ : इटलीचा हुकूमशहा बेनिटो मुसोलिनी याचा वध (जन्म: २९ जुलै १८८३)
१९७८ : अफगाणिस्तानचे पहिले अध्यक्ष मोहम्मद दाऊद खान यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९०९)
१९९२ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (जन्म: ९ ऑगस्ट १९०९)
१९९८ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (जन्म: २० जून १९३९)

# तुती लागवड एक शेतीपूरक व्यवसाय

शेतकरी पिढ्यानपिढ्या पारंपरिक शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, काही शेतकरी नव्या वाटा शोधून शेतीमधून भरपूर उत्पन्न कमावत असतात. रेशीम शेती म्हणजेच तुती लागवड ही अशा शेतकऱ्यांसाठी एक चांगला मार्ग आहे. थोडे कष्ट, व्यवस्थितपणा व शिस्त यांचा अवलंब केला तर कमी खर्चात रेशीम शेतीतून भरघोस उत्पन्न घेता येते व आपल्या कुटुंबातील सर्वांना रोजगारही पुरवता येतो. जाणून घेऊया तुती रेशीम शेती विषयी

रेशीम शेतीचे महत्त्व : रेशीम शेती हा शेतीपूरक उत्कृष्ट जोडधंदा आहे. वर्षातून ४ ते ५ पिके घेता येतात. एकदा केलेली तुती लागवड १० ते १५ वर्षे टिकते. पर्यावरणपूरक व्यवसाय, कमीत कमी रासायनिक खतांचा वापर, घरातील प्रत्येक व्यक्तीला घरातच रोजगार मिळतो. त्यामुळे मजुरीचाही प्रश्न मिटतो. इतर पिकांच्या तुलनेत कमी पाणी व खते लागतात. उत्पादित कोषांना बाजारपेठेत चांगला भाव मिळतो. शासनातर्फे नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.लाभार्थी शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना :नवीन शेतकऱ्यांना एकरी ५०० रू. भरून लागवडीसाठी नोंदणी करून सभासद होता येते. अशा शेतकऱ्यांना अंडीपुंज अनुदान योजना, प्रशिक्षण, सिल्कसमग्र योजना अंतर्गत लाभ, मनरेगा, या अनुदान योजनांचा त्या शेतकऱ्यांनी शासनाचे आवश्यक ते निकष पूर्ण केल्यानंतर लाभ घेता येतो.

मगांराष्ट्रीयग्रा रोजगार हमी योजनेअंतर्गत तुती लागवड योजना :स्वतःच्या शेतीवर काम करून शासनामार्फत मजुरी मिळणारी ही एकमेव योजना आहे. शासनमान्य समूहात तुती लागवड (एका गावात किमान १० शेतकरी, १० एकर आवश्यक). रेशीम शेती योजनेंतर्गत पूर्वी लाभ घेतलेले शेतकरी नसावेत. कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ मिळेल. प्रति लाभार्थी फक्त एक एकर तुती लागवड मर्यादा. लाभार्थी निवडीमध्ये नियमाप्रमाणे सामाजिक आरक्षण. ग्रामसभेच्या ठरावाद्वारे लाभार्थी निवड. मनरेगा अंतर्गत ३ वर्षांमध्ये अकुशल मजुरी म्हणून एकूण २ लाख ६५ हजार ८१५ रूपये व कुशल मजुरी रक्कम १ लाख ५३ हजार रूपये अशी एकूण ४ लाख १८ हजार ८१५ रूपये इतकी रक्कम मिळते. सिल्कसमग्र योजनेंतर्गत तुती लागवड, सिंचन संच, कीटक संगोपन गृह, कीटक संगोपन साहित्य, निर्जंतुकीकरण साहित्य यासाठी एक एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ३ लाख ७५ हजार रूपये तर अनुसूचित जातीसाठी ४ लाख ५० हजार रूपये व २ एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ४ लाख ६८ हजार ७५० रूपये तर अनुसूचित जातीसाठी ५ लाख ६२ हजार ५०० रूपये इतके अनुदान आहे.

मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# घरपोच शासकीय सेवांचे जालना मॉडेल ठरले प्रेरणादायी

## मुख्य सचिवांच्या हस्ते जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा विशेष सन्मान

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीत जालना जिल्ह्याने राज्यासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. जालना मित्र पोर्टलच्या माध्यमातून शासकीय सेवा थेट नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचविण्याच्या अभिनव उपक्रमाची दखल घेत, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा राज्य शासनाच्या वतीने विशेष गौरव करण्यात येणार आहे.द्वितीय सेवा हक्क दिनानिमित्त मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात सकाळी ११ वाजता हा भव्य राज्यस्तरीय सोहळा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान केला जाईल.

सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयातील कामासाठी लागणार वेळ वाचावा तसेच वारंवार कार्यालयाला भेटी देऊन वाहतुकीसाठी अतिरिक्त पैसा खर्च करावा लागू नये, या हेतूने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना मित्र हे विशेष पोर्टल व चॅटबॉट विकसित केले. दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन करून या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. या पोर्टलच्या माध्यमातून विविध दाखले आणि शासकीय सेवा पारदर्शकपणे आणि गतीने थेट घरपोच उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय कामात आणलेली ही सुसूत्रता आणि लोकाभिमुखता यामुळे जालन्याचा हा उपक्रम राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. जालना जिल्ह्याने राबविलेला हा प्रयोग राज्यातील इतर जिल्हाधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरावा, या उद्देशाने हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रशासकीय सेवेचा दर्जा



उंचावण्यासाठी आणि सामान्य माणसाचा वेळ व पैसा वाचविण्यासाठी केलेल्या या यशस्वी प्रयोगाबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. जालना मित्र या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १३२१ नागरिकांना घरपोच सेवा मिळालेल्या आहेत. यामध्ये जेष्ठ नागरिक, अपंग, नोकरी करणारे दांपत्य तसेच महिला, विद्यार्थ्यांना विशेष लाभ झाला सून सदर उपक्रम हा संपूर्ण राज्याठी एक आदर्श ठरला आहे. या उपक्रमामुळे सरकारी सेवा आता थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचत आहेत, ज्यामुळे वेळ व प्रवासाचा खर्च वाचत आहे. जालना मित्र या उपक्रमामुळे कामाचे तास किंवा सुटीच्या दिवसाचे कोणतेही बंधन नाही, यामुळे नागरिक त्यांच्या सोयीनुसार सेवा घेऊ शकतात. तसेच या उपक्रमामध्ये सध्याच्या ग्रामस्तरीय उद्योजक नेटवर्कचा प्रभावी वापर करून सेवांचे जाळे आणखी विस्तारीत केले जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी सर्व विभागाशी सु-संवाद साधून वेळोवेळी आढावा बैठका, सुचना तसेच परिपूर्ण प्रशिक्षण दिले आहेत. प्रलंबित प्रकरणांवर विशेष लक्ष देउन नागरिकांना वेळेवर सेवा कशा मिळतील यावर भर दिला गेला.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयास उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार



पाथर्डी। प्रतिनिधी

क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरी आणि शिस्तबद्ध आयोजनाच्या जोरावर पाथर्डी येथील पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहिल्यानगर विभागातर्फे दिला जाणारा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रतिष्ठेचा उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार या महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला विशेष म्हणजे सलग दुसऱ्या वर्षी हा बहुमान मिळवून महाविद्यालयाने जिल्ह्याच्या क्रीडा नकाशावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे मिरजगाव येथील नूतन महाविद्यालयात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला या सोहळ्याला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.सुदाम शेळके माजी संचालक डॉ.दिपक माने जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.तानाजी जाधव सचिव डॉ.राजेंद्र देवकाते उपस्थित होते पुरस्काराचा स्वीकार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांच्यासमवेत शारीरिक शिक्षण संचालक डॉ.विजय देशमुख यांच्यासह प्रा.डॉ.अरुण राख प्रा.डॉ.अशोक डोळस प्रा.डॉ.अजयकुमार पालवे व प्रा.डॉ.आनंद घोंगडे आदी उपस्थित होते पार्थ विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी या यशाचे श्रेय खेळाडूंच्या मेहनतीला व उत्कृष्ट मार्गदर्शक शिक्षकांना दिले आहे.

## रोबोटिक्स व एआय प्रशिक्षण उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद



मंठा। प्रतिनिधी

विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये मागील एक महिन्यापासून रोबोटिक्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स ( एआय) या विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.हा उपक्रम सायन्स किड्झ मुंबई ॲकॅडमीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन (प्रशिक्षक) रवी गुप्ता यांनी केले,जे सध्या अमेरिकेत कार्यरत आहेत. त्यांनी तेथील प्रगत तंत्रज्ञानाचा अनुभव घेऊन, येथील विद्यार्थ्यांना आधुनिक रोबोटिक्स आणि एआय विषयी सखोल मार्गदर्शन केले.या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रकल्पांच्या माध्यमातून शिकविण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः काही नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार केले, जसे की स्मार्ट फूड बॉक्स फॉर नॉन-प्रिव्हिलेज्ड पीपल हा प्रकल्प गरजू लोकांपर्यंत अन्न पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरतो, ज्यामुळे अन्नाची नासाडी कमी होऊन गरजूंना मदत मिळू शकते.

शेतकऱ्यांसाठी ऑटोमॅटिक वेदर सिस्टीम या प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती आणि अलर्ट मिळू शकतात,ज्यामुळे ते आपल्या पिकांची योग्य काळजी घेऊ शकतात.या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करणे हा होता. आजच्या युगात रोबोटिक्स आणि एआय हे केवळ विषय नसून भविष्यातील तंत्रज्ञानाची पायाभरणी आहेत. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता,तार्किक विचारशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नवकल्पनांची आवड विकसित झाली आहे.विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील हा उपक्रम लहान शहरांतील विद्यार्थ्यांना जागतिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे. खरंच,आजचे हे विद्यार्थी उद्याचे वैज्ञानिक,अभियंते आणि नवोन्मेषक बनण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करत आहेत. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या या उपक्रमाची आज सांगता करण्यात आली. हा उपक्रम शाळेचे अध्यक्ष संदीप बाहेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रश्मी यादव मॅडम, (प्रशिक्षक) रवी गुप्ता,राठोड सर,सर्व शिक्षक वृंद,तसेच पालक आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी बाहेकर सर व यादव मॅडम यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर उपक्रमाचे मार्गदर्शक रवी गुप्ता यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांसह पालकवर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी शाळेचे अध्यक्ष बाहेकर सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे उपक्रम शाळेमार्फत राबवली जातील. असे आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले. या प्रकल्पाचे पंचक्रोशीसह इतर सर्व स्तरातून जोरदार कौतुक होत आहे. शाळेने असे उत्कृष्ट उपक्रम यापुढेही विद्यार्थ्यांसाठी राबवावे अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

## बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्याला ग्रॅच्युइटी नाकारणे बेकायदेशीर

### उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निर्वाळा बीड जि.प. शिक्षण विभागाचा आदेश रद्द

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

सेवेतूनबडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्याला ग्रॅच्युइटी (उपदान) नाकारणे बेकायदेशीर असून, ग्रॅच्युइटी ही मालकाची मर्जी नसून तो कर्मचाऱ्याचा वैधानिक अधिकार आहे. अनधिकृत गैरहजेरीच्या कारणावरून बडतर्फ केलेल्या ७६ वर्षीय शिक्षकाला दिलासा देत, न्यायालयाने बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकाऱ्याचा जुना आदेश रद्द करत, चार आठवड्यांत ग्रॅच्युइटीची रक्कम देण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती वैशाली पाटील-जाधव यांनी दिले.

प्रभाकर ज्ञानोजी वैद्य हे बीड जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. अनधिकृत गैरहजेरीच्या कारणावरून ११ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांना सेवेतूनचार आठवड्यांत रक्कम देण्याचे आदेश खंडपीठाने बीड जिल्हा परिषदेचा आदेश रद्दबातल ठरवून, याचिकाकर्त्याची ग्रॅच्युइटी चार आठवड्यात मोजून त्यानंतरच्या दोन आठवड्यात अदा करण्याचे आदेश प्रतिवादींना दिले आहेत. याचिकाकर्त्यातर्फे ॲड. विठ्ठल सलगरे यांनी काम पाहिले. शासनातर्फे ॲड. एस. आर. वाकळे आणि जिल्हा परिषदेतर्फे ॲड. प्रशांत सूर्यवंशी यांनी बाजू मांडली. बडतर्फ केले. त्यानंतर त्यांनी ग्रॅच्युइटी मिळवण्यासाठी पाठपुरावा केला, मात्र शिक्षण अधिकाऱ्यांनी (प्राथमिक) २९ मार्च २०२३ रोजी त्यांचा अर्ज फेटाळून लावला.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नुसार बडतर्फ कर्मचाऱ्याला ग्रॅच्युइटी देण्याची तरतूद नाही असे त्यांना उत्तर देण्यात आले. या निर्णयाला वैद्य यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यालयाने स्पष्ट केले की, संबंधित कर्मचाऱ्याचे प्रकरण हे ग्रॅच्युइटी पेमेंट ॲक्ट, १९७२ नुसार चालते. या कायद्यातील कलम ४ (६) नुसार, केवळ मालमत्तेचे नुकसान, हिंसाचार किंवा नैतिक अधःपतनाचा गुन्हा सिद्ध झाला तरच ग्रॅच्युइटी रोखता येते. या प्रकरणात केवळ गैरहजेरीच्या कारणावरून ग्रॅच्युइटी नाकारणे चुकीचे आहे. ग्रॅच्युइटीही कर्मचाऱ्याने आयुष्यभर केलेल्या निष्ठवेच्या सेवेचा मोबदला आहे. तो राज्यघटनेच्या कलम ३००-अ अंतर्गत संरक्षित आहे, असेही न्यायालयाने नमूद केले.

## पद, प्रतिष्ठा विसरले, २६ वर्षांनी जुने सवंगडी भेटले

अहिल्यानगर । प्रतिनिधी

एकत्र बसून खाल्लेले डबे.. मैदानावर खेळलेले खेळ.. हातावर खाल्लेल्या छड्या.. शाळा सुटली, पण या आठवणी मनाच्या खोल कप्प्यात कायम राहिल्या. तब्बल २६ वर्षानंतर पुन्हा एकदा हा कप्पा उघडला.. शाळेतून बाहेर पडल्यानंतर कोणी अधिकारी झाले, कोणी मोठे व्यावसायिक, तर कोणी शेतीत रमले. मात्र, शाळेच्या प्रवेशद्वारातून आत शिरताना प्रत्येक जण आपली पद आणि प्रतिष्ठा बाहेर सोडून तोच १९९९ मधील विद्यार्थी झाला होता. एकमेकांना फेटा बांधून आणि गुलाबपुष्प देऊन करण्यात आलेल्या सत्काराने वातावरणात एक उत्साह भरला होता. निमित्त होते माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे.

श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातून १९९९ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवारी (२५ एप्रिल) मोठ्या उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. एल. नरवडे उपस्थित होते. यावेळी तत्कालिन शिक्षक शिवाजी दाते, हिराबाई खंडागळे, आबासाहेब रसाळ, ज्ञानदेव गांगर्डे, रोहिदास ननवरे आदी उपस्थित होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्नेहमेळाव्यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व फेटा बांधून सत्कार करण्यात आला. शालेय आठवणींना उजाळा देताना अनेकांना आपल्या भावना अनावर झाल्या होत्या. आपले वय, पद, प्रतिष्ठा सारे काही विसरून हे माजी विद्यार्थी पुन्हा एकदा शालेय आठवणींमध्ये रमले. प्राचार्य नरवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या पाल्याचे योग्य संगोपन करताना, त्याच्यावर कोणतेही दडपण आणू नका, असा सल्ला दिला. रसाळ सर, गांगर्डे सर यांनीही माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तब्बल २६ वर्षांनंतर या माजी विद्यार्थ्यांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी भीमराव क्षीरसागर, गोविंद विधाते शिवकुमार बोरुडे व सुषमा शेटे यांनी प्रयत्न केले. ज्ञानदेव घोडे यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहभोजनाने मेळाव्याची सांगता झाली. घोगरगाव येथील १९९९ सालच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

## पानंद रस्त्यासाठी शहाजानपूर ग्रामस्थांचा तीस वर्षाचा संघर्ष

### रस्ता होत नसल्याने अडचणींचा डोंगर; निवेदने देऊन ग्रामस्थ वैतागले



बीड । प्रतिनिधी

एकीकडे पानंद रस्त्यासाठी शासन सर्व काही करीत असल्याचा देखावा करत असले तरी वास्तविक मात्र ग्रामस्थांना पानंद रस्त्यासाठी वर्षानुवर्ष संघर्ष करावा लागत आहे. काही केल्या पानंद रस्ता होत नसल्याने व निवेदने देऊनही थकल्याने ग्रामस्थांच्या नशिबी अडचणींचा डोंगर कायम आहे.

ही व्यथा आहे गेवराई तालुक्यातील शहाजनपुर चकला ग्रामस्थांची. गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग गावापासून दीड ते दोन किमी अंतरावर शहाजानपूर जुने गावठाण व घुगे व सानप वस्ती आहे. गाव आता नवीन जागेवर वसले असले तरी जुने गावठाण व घुगे,सानप वस्ती येथे जाण्यासाठी पानंद रस्त्याचा प्रश्न गेल्या ३० वर्षापासून जिकिरीचा बनला आहे. जुन्या गावठाण परिसरात स्मशानभूमी आहे तसेच या भागात ग्रामस्थांची शेती ही आहे. याच परिसरात घुगे व सानप वस्ती आहे. त्या वस्तीवरील लहान मुले यांना शाळेत जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तर पावसाळ्यात काटे व चिखल तुडवीत जावा लागते. याच रस्त्यावरून अंतयात्रा ही जाते अशावेळी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ही अडचण लक्षात घेऊन या ठिकाणी पानंद रस्ता करावा अशी मागणी गेल्या ३० वर्षापासून या गावचे नागरिक करीत आहेत. यासाठी त्यांनी तत्कालीन खासदार, आमदार, मंत्री, तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी निवेदने दिलेली आहेत. गेल्या अनेक वर्षापासून हे ग्रामस्थ सतत संघर्ष करीत असले तरी रस्ता होत नसल्याने आता ग्रामस्थांनी मात्र हात टेकले आहेत.

रस्ता होतच नसल्याने त्यांच्या नशिबी वनवास कायम असल्याने आता कोणाचा दरवाजा झिजवावा असा प्रश्नही ग्रामस्थांसमोर उभा आहे. पानंद रस्ते करण्यासाठी शासन आग्रही असले तरी शहाजनपूर ग्रामस्थांचा रस्ता होत नसल्याने संपूर्ण ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या रस्त्यासाठी ग्रामपंचायतने ठराव ही घेतला आहे. रस्त्या वाचून ग्रामस्थ, महिला, शेतकरी, लहान मुले यांचे मोठे हाल होत असल्याने शासनाने याची दखल घेऊन आता तरी रस्ता करावा व ग्रामस्थांना न्याय द्यावा अशी मागणी बाबुराव जेठे मामा, शामराव घुगे, संदीप सोलनकर आदी ग्रामस्थांतून होत आहे.

## जागतिक हिवताप दिन साजरा

जालना । प्रतिनिधी

हिवताप दुरीकरण शक्य आहे त्यासाठी आपण कटीबध्द आहोत असे डॉ. जी. डी. म्हस्के म्हणाले जालना जिल्हयात मागील वर्षात लक्ष १९ हजार रक्तनमुने जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत तपासण्यांत आले परंतु स्थलांतरीत ०१ हिवताप रुग्ण आढळून आला. यावरुन असे लक्षात येते की, जालना जिल्हा दुरीकरण करण्याच्या अगदी जवळ आहे. त्यासाठी या ही वर्षी सुध्दा मागील वर्षीप्रमाणे हिवताप रुमम निरक ठेवण्यासाठी जिल्हा हिवताप कार्यालय कटीबध्द असल्याचे जागतिक हिवताप विनाच्या प्रसंगी डॉ.जी.डी. म्हस्के यांनी सांगितले. यावर्षीचे घोषवाक्य त्याचे मराठी भाषांतर ''हिवताप दुरिकरणासाठी कटीबध्दः आता हे शक्य आहे. हे केलेच पाहिजे हे या वर्षीचे भोय वाक्य आहे. जागतिक हिवताप दिनानिमित्त जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत विविध जनजागृतीपर उपक्रम डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजता प्रबोधनात्मक रैली काडण्यात आली. डॉ.जी.डी. म्हस्के (सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी) ब डॉ. नागदरबाड यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखवुन रॅलीचा शुभारंभ केला. रॅली मध्ये परिधारीना प्रशिक्षण केंद्र येथील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी, आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेऊन हिवतापाच्या प्रतिबंधात्मक घोषणा देवून रॅली यशस्वी केली.

डॉ.जी.डी. म्हस्के (जिल्हा हिवताप अधिकारी) यांनी परिचारीकांना, आशा स्वयमंसेविका, उपस्थित नागरीकांना हिवताप रोग नियंत्रण प्रतिबंधात्मक उपययोजना बाबत शपथ दिली. तसेच हिवताप रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना व नियंत्रणाकरीता जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धाचे आयोजन केले होते. या स्पर्धाचे उद्?द्धाटन डॉ. नागदरबाड, सर, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.जी.डी. म्हस्के यांनी यावेळी परिसर स्वच्छता तसेच वैयक्तीकरीत्या करावयाच्या उपाययोजना, खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळी बसविणे, सांडपाण्याची डबकी वाहती करणे, आठवडयातुन एक दिवस कोरडा दिवस पाळणे, ओपतांना मच्छरदानीचा वापर करपे, आदी उपाययोजनांची माहिती देऊन हिवताप रोगाच्या वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या डासांच्या अळया नष्ट करणारे गप्पी मासे दाखवुन हिवतापाची लक्षणे, बंडी बाजुन ताप येणे, डोकेदुखी, मळमळने असे हिवतापाची लक्षणे दिसताक्षणी मोफत शासकिय रुग्णालयात तपासणीचे आवाहन केले. यावेळी श्री.डि.एस. बोराडे (जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी) यांनी किटकजन्य आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन करुन हिवताप दुरीकरणाचे महत्व विशद केले. जागतिक हिवताप दिन यशस्वी करण्याकरीता थी.एस.व्ही. वाडेकर (सहायक जिल्हा हिवताप अधिकारी), श्री.व्ही.एस. गवळी (तांत्रिक विभाग प्रमुख), श्री. नितिन सोनकर, श्री. किरण काळे, श्री. सौरभ मुंढे (प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी), श्रीमती गिता चव्हाण आ. पर्यवेक्षक, श्री. विवेक केंडे, काटे किटकसमाहारक, श्री.पी.एस.बावणे, श्री.जी.एम. देशपांडे, श्री.पी.एस. पवार, श्री. आर.एल. पालवे (आरोग्य निरिक्षक) श्री. विष्णु मगरे (वाहन चालक) ची तुकाराम टिप्परकर, श्री. प्रकाश राठोड, श्री. शेख रईस, (क्षेत्र कर्मचारी) जालना शहरातील सर्व आरोग्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री कृष्णा कापरे यांनी केल

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# मित्रानेच केली मित्राची हत्या

बीड । प्रतिनिधी

मोबाईलमधील फोटोच्या कारणावरून मित्रांनीच १९ वर्षीय तरूणाची चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना काल रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास लिंबा (ता.शिरूर कासार) गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पुर्वेस असलेल्या हेलिपॅडच्या मोकळ्या जागेत घडली. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात होमगार्डसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हत्या प्रकरणातील एका आरोपीला तेथील ग्रामस्थांनी पकडून ठेवत पोलिसांच्या स्वाधीन केले असून अन्य तिघे फरार आहेत. दरम्यान या घटनेने खळबळ उडाली असून मयत हा बेलुरा (ता.बीड) येथील रहिवासी आहे.



बीड तालुक्यातील बेलुरा येथील सुमित गवते (वय १९) या तरूणाची त्याच्याच मित्रांनी धारदार चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना काल रात्री आठ वाजण्याच्या सुमारास लिंबा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पुर्वेस असलेल्या हेलिपॅडच्या जागेत घडली. याप्रकरणी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, बेलुरा येथीलच रुस्तुम गोवर्धन गवते, ज्ञानेश्वर दत्ता लाटे व सुरज नागरगोजे यांनी सुमित गवते याला पकडून ठेवले होते. तर रितेश सतिश बहीर याने त्याच्या हातातील चाकूने सुमितच्या पोटात भोसकले. सुमित रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. हे पाहून घटनास्थळावरून सर्वजण पळून गेले. त्याचवेळी ज्ञानेश्वर लाटे याला ग्रामस्थांनी पकडून ठेवले. प्रचंड प्रमाणात रक्तास्त्राव झाल्याने सुमित गवते याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती कळताच सुमितच्या नातेवाईकांनी व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनीही तात्काळ घटनास्थळी जावून ग्रामस्थांनी पकडून ठेवलेल्या ज्ञानेश्वर दत्ता लाटे यास ताब्यात घेतले. सदरील प्रकार हा मोबाईलमध्ये फोटोच्या कारणावरून घडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून तशी नोंद तक्रारीत घेण्यात आली आहे. काही आक्षेपार्ह फोटो दाखवल्याचा कारणावरून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी शहादेव आश्राजी गवते यांच्या फिर्यादीवरून रितेश सतिश बहीर, रुस्तुम गोवर्धन गवते, ज्ञानेश्वर दत्ता लाटे (तिघे रा.बेलूरा, ता.बीड) , सुरज मच्छिंद्र नागरगोजे (रा.लिंबा, ता.शिरूर कासार) यांच्याविरुध्द बीएनएस कलम १०३ (१), ६१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी रितेश बहिर हा होमगार्ड असल्याची माहिती आहे. या खून प्रकरणात एकूण चार आरोपींपैकी ग्रामस्थांनी पकडून ठेवलेल्या ज्ञानेश्वर लाटे याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य तिघांचा शोध सुरू आहे.

# बीडमध्ये कृषी व्यापाऱ्यांचा बेमुदत संप

बीड । प्रतनिधी

ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. राज्यातील कृषी विक्रेत्यांवर दरवर्षी लादल्या जाणाऱ्या नवनवीन अटी, नियम आणि डिजीटल नियंत्रण प्रणालीच्या जाचक अटींचा निषेध करण्यासाठी बीड येथील व्यापाऱ्यांनी आजपासून बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. खत कंपन्यांकडून लिकिंगची सक्ती केली जात असून दुसरीकडे बियाणे बोगस निघाल्यास कंपन्याऐवजी कृषी विक्रेता दुकानदाराला जबाबदार धरले जात आहे. हा सर्व प्रकार थांबावा या मागणीसाठी बीड जिल्ह्यातील कृषि साहित्य विक्रेत्यांनी आज शहरातील मोंढा भागात होळी करून निषेध व्यक्त केला आहे.

बीडसह राज्यभरातील ८५ हजाराहून अधिक कृषि साहित्य



विक्रेत्यांनी आजपासून बेमुदत बंद पुकारला आहे. हा संप महाराष्ट्र फर्टीलायझर पेस्टिसाइड असोसिएशनच्या राज्यव्यापी आवाहनाचा भाग असून, यामध्ये बीड जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनीही सहभाग नोंदवला आहे. कृषी विभागाकडून दरवर्षी तपासणी आणि डिजिटल प्रणालीच्या नावाखाली कडक अटी लादल्या जात आहेत. यामुळे लाखो रुपयांचे भांडवल लावून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांमध्ये परवाना रद्द होण्याच्या भीतीचे वातावरण आहे. निविष्ठांच्या तुटवड्यामुळे विक्रेत्यांना आर्थिक फटका बसतो, तर उपलब्ध मालाची वेळेवर विक्री न झाल्यास तो पडून राहून मोठे नुकसान होत आहे. सर्व जाचक अटी आणि धोरणाविरुध्द कृषि विक्रेते एकवटले आहे. या संपाचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता ◀◀ पान ३ वर

# माजलगावात 'गो सम्मान आव्हाण' रॅली; गोवंश हत्येविरोधात नागरिकांचा आवाज

## नागरिक आक्रमक; प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी होत असल्याचा दावा केला जात असताना बीड जिल्ह्यात मात्र खुलेआम कत्तल होत असल्याचा आरोप समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर माजलगाव येथे दि २७ एप्रिल सोमवार रोजी'गो सम्मान आव्हाण अभियान' अंतर्गत मोठी रॅली काढत नागरिकांनी प्रशासनाला निवेदन दिले.

बीड जिल्ह्यात गोवंश




कत्तलप्रकरणी संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि सकल हिंदू समाजाने केला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी पोलीस ठाण्यांच्या परिसरातच गोवंशाची सर्रास कत्तल करून मांस विक्री होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.मात्र,याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची टीका करण्यात येत आहे. या प्रकरणी ◀◀ पान ३ वर

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांना सरपंच परिषदेचा आदर्श समाजसेवा पुरस्कार

## प्रा.राम शिंदे व ना.जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांना सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा 'आदर्श समाजसेवा' पुरस्कार जाहीर झाला आहे. विधान परिषदेचे सभापती मा.प्रा.राम शिंदे व ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे, विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय आदि मान्यवरांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण होणार आहे. गुरूवार दिनांक ३० एप्रील रोजी सकाळी ११.०० वाजता



यशदा पुणे येथे हा दिमाखदार सोहळा संपन्न होणार आहे.

सक्षम ग्रामपंचायत व सन्मानित सरपंच यासाठी सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र ही संघटना कार्यरत आहे. पंचायत राज ला चांगली दिशा देण्यासाठी परिषदेच्या वतीने उत्कृष्ट काम करणाऱ्या राज्यातील चार लोकप्रतिनिधींना व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या दोन व्यक्तींना प्रति वर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यंदाच्या आदर्श समाजसेवा पुरस्कारासाठी डॉ.ओमप्रकाशजी शेटे यांची निवड करण्यात येत असल्याचे सरपंच परिषदेचे मुख्य मार्गदर्शक तथा आदर्शगाव योजना महाराष्ट्रचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार व सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी कळवले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून डॉ.ओमप्रकाश शेटे हे ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न सरकार दरबारी मांडून ते सोडविण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहेत. गाव खेड्यातील नागरीकांच्या प्रश्नांना सातत्याने न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत असल्याची बाब लक्षात घेता सरपंच परिषदेच्या राज्य कार्यकारणीने त्यांना आदर्श समाजसेवा पुरस्कार देण्याचा निर्णय सरपंच परिषदेच्या राज्य कार्यकारणीने घेतला आहे. सदरील कार्यक्रम बाणेर रोड, पुणे येथील ◀◀ पान ३ वर

# शिवद्रोहींवर कारवाईची मागणी; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी तथ्यहीन व ऐतिहासिक आधार नसलेली विधाने करून अवमानना करणाऱ्या बागेश्वरधामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर कठोर कारवाई करावी, या प्रमुख मागणीसाठी शिवप्रेमी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.२७) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.



फडणवीस सरकारच्या कार्यकाळात बहुजन महापुरुषांची अवमानना करणाऱ्या वाचाळवीरांच्या संख्येत वाढ झाल्याचा आरोप करत, सरकारकडून ठोस कारवाई होत नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले. ◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये बालविवाहा विरोधात पोलिसांची मोठी कारवाई; एकाच आठवड्यात तीन गुन्हे दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण रोखण्यासाठी 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष' (-क्ढण) कडून आक्रमक पावले उचलली जात आहेत. मागील एकाच आठवड्यात बीड पोलिसांनी विविध ठिकाणी धाडी टाकून एकूण तीन बालविवाहाचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईमुळे बालविवाह करणाऱ्या आणि त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

वेषांतर करून कारवाई; दहीफळमधील विवाह रोखला

दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी बीड तालुक्यातील दहीफळ येथे एका १५ वर्षीय मुलीचा विवाह इरफान बेग (वय २४ वर्षे) याच्याशी लावला जात असल्याची गुप्त माहिती एएचटीयूच्या प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव



यांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. लग्नमंडपात मोठी गर्दी असल्याने पोलिसांनी सापळा रचला. दोन महिला अंमलदारांनी वेषांतर करून मंडपात प्रवेश केला आणि पीडित मुलीस ताब्यात घेतले.

या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम ९, १० आणि ११ नुसार नवरदेव, मुलीचे आई-वडील आणि नातेवाईक अशा १० जणांसह इतर १५ ते २० वऱ्हाडींविरुद्ध गुन्हा दाखल ◀◀ पान ३ वर

# आज २६ ग्रा.पं च्या पोटनिवडणुका, उद्या मतमोजणी

बीड । प्रतिनिधी

राज्यातील ग्राम पंचायतीतील सदस्य थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त जागांच्या पोट निवडणूकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम निश्चित केला असून सदर कार्यक्रमानुसार दि.२८.०४.२०२६ रोजी मतदान होणार असून दि.२९.०४.२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. सदर निवडणूक प्रक्रिया शांततेत, मुक्त, निष्पक्ष व निर्भय वातावरणात पार पडणे अत्यंत आवश्यक असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी योग्य ते आदेश निर्गमीत करणे बाबत नमूद केले आहे. ग्रामपंचायत पोट निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी मतदान केंद्र व मतमोजणीच्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करणे आवश्यक आहे.

बीड जिल्ह्यातील सौंदाना, वागदरवाडी, धानोरा बुद्रुक, अमला निमला, मस्साजोग, बोरखेड, पाली, नाळवंडी, कुसळंब, सौताडा, सिरसाळा, जळगव्हाण, मरळवाडी, धर्मापुरी, काडीवडगाव, ब्रह्मगाव, वांगी बुद्रुक ,घळाटवाडी, तांदळा, काठोकाठ, आहेर वाहेगाव, पांढरी, सेक्टा, खोकर मोहा, सावरगाव घाट, सुलेमान देवळा आदी गावातील ३७८६६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील.

मतदान केंद्राचे ठिकाणापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परीसरातील सर्व पक्ष कार्यालय/उमेदवारांचे मंडपे, सर्व दुकाने ई. तसेच मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व ईतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे ईत्यादींच्या वापरावर बंदी घालत आहे.

निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त इतर खाजगी वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतदान केंद्राचे ठिकाणापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परीसरात नियुक्त अधिकारी /कर्मचारी यांना वगळून पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परंतू जे मतदार मतदानासाठी मतदान केंद्राचे ठिकाणी रांगेत उभे असतील त्यांना आदेश लागू राहणार नाही. मतदान केंद्र परिसरात ध्वनीक्षेपक वापरास, वाद्य वाजविणेस व मिरवणुका काढणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.मतदान केंद्राचे १०० मीटरच्या आत व मतमोजणी केंद्राच्या २०० मीटरच्या आत संबंधीत पक्षाचे /उमेदवाराचे चिन्हांचे प्रदर्शन करणेस तसेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी व मतदान करण्यासाठी आलेल्या व्यक्तीं व्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.सदर आदेश हे निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत. सदर आदेश हे निवडणूकीची कामे हाताळताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या दृष्टीकोनातून दिनांक २८.०४.२०२६ रोजी मतदानाच्या दिवशी व दिनांक २९.०४.२०२६ रोजी मत मोजणीच्या दिवशी सकाळी ०६.०० वाजेपासून ते मतदान प्रक्रिया व मत मोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील.

# वाळूमाफियाची तलाठ्याला धक्काबुक्की

गेवराई । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून चकलांबा व गेवराई पोलीस ठाण्याचा कारभार वादग्रस्त ठरत असून, स्वतः पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी स्थानिक ठाणेदारांची कानउघाडणी केल्यानंतरही येथे वाळू माफियांची दहशत कायम आहे. हिंगणगाव परिसरात दोन अनधिकृत वाळूचे ट्रॅक्टर पकडण्यासाठी गेलेल्या तलाठ्याला धक्काबुक्की करून वाळू माफियांनी दोन्ही ट्रॅक्टर चकलांबा हद्दीत पळवले असल्याची घटना दि. २७ रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्याचे आदेश गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांनी दिले आहेत.

सविस्तर माहिती अशी की, गेल्या दोन महिन्यांपासून चकलांबा व गेवराई पोलीस प्रशासन आणि ठाणेदार सचिन इंगळे व ईतर वादाच्या भोवऱ्यात आहेत. पदभार स्वीकारल्यापासून अल्पावधीतच वाळू माफियांशी सूत्र जुळवून घेणारे ठाणेदार अशी त्यांची ख्याती झाली आहे. चकलांबा पोलीस ठाण्याची हद्द अवैध धंदे आणि अनधिकृत वाळू उपशाचे केंद्र बनली आहे.

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी स्वतः अवैध धंद्यांबाबत ठाणेदारांना कडक सूचना दिल्या होत्या. मात्र, वरिष्ठांच्या आदेशाला न जुमानता या हद्दीत अनधिकृत वाळू उपशाचा जोर वाढतच चालला आहे. आज आपले कर्तव्य बजावत असताना हिंगणगावच्या स्थानिक तलाठ्याला धक्काबुक्की करून वाळूने भरलेली दोन ट्रॅक्टर वाहने वाळू माफियांनी पळवली.

वाळू उपसा रोखण्यासाठी पोलीस प्रशासन काय करतेय, असा सवाल आता उपस्थित होत आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश तहसीलदार संदीप खोमणे यांनी दिले असून, पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी देखील या प्रकरणात लक्ष घालावे, अशी मागणी जनसामान्यांतून होत आहे. तसेच चकलांबा पोलिसांनी एक जेसीबी यांच्यावर देखील कार्यवाई केली असल्याची माहिती आहे.

# उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन


बीड । प्रतिनिधी

उन्हाळ्यात तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

सुरक्षेचे उपाययोजना

तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी ओआरएस (जठड), लस्सी, लिंबू पाणी, ताक आणि कैरीचे पन्हे यांसारख्या घरगुती पेयांचा वापर करावा.

बाहेर पडताना हलके, पातळ आणि सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी किंवा ओल्या कापडाचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे.



कष्टाची कामे पहाटेच्या वेळी उरकून घ्यावीत आणि कामाच्या ठिकाणी मध्ये-मध्ये विश्रांती घ्यावी.घर थंड ठेवण्यासाठी पडदे आणि सनशेडचा वापर करावा. रात्रीच्या वेळी खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पाळीव प्राणी आणि गुरांना छावणीत ठेवावे व त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी द्यावे.

चक्कर येणे, सतत घाम येणे, डोकेदुखी किंवा अशक्तपणा जाणवल्यास ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशा वेळी तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

सावधगिरीच्या सूचना

चहा, कॉफी, दारू आणि कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या पार्क केलेल्या वाहनात सोडू नका. तापमान जास्त असताना कष्टाची कामे टाळावीत. उन्हाच्या तीव्र कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे आणि स्वयंपाकघरात हवेशीर वातावरण ठेवावे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अधिक माहितीसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सोशल मीडिया हँडलला (डऊव-चरहरीरीहीर) भेट द्यावी किंवा जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांचे पालन करावे. स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उष्माघातापासून बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मातंग समाजातील शैक्षणिक अंधार दूर करण्याची ध्येयवेड्या तरुणाची धडपड

## अमोल शेरकरच्या शिक्षण संवाद यात्रेला तालुक्यातून मोठा प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

मातंग समाजातील शैक्षणिक मागासलेपणाला छेद देत,नव्या पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवण्यासाठी एक तरुण झटताना दिसत आहे.हा तरुण म्हणजे अमोल शेरकर.शिव,फुले शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ,लहुजीयांच्या प्रेरणेतून ध्येय, जिद्द आणि सामाजिक बांधिलकी जोपासत सध्या त्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने १४ एप्रिल पासून



संपूर्ण माजलगाव तालुक्यात शिक्षण संवाद यात्रा राबवत समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य सुरु केले असूनही या यात्रेला तालुक्यातील समाज बांधवांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

जयभीम,जय लहूजीचा नारा देत अमोल शेरकर हा सर्व सामान्य कुटुंबातील ध्येयवादी तरुण शिक्षण संवाद यात्रेद्वारे मांगवाड्यांमध्ये पोहोचत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एकाच कुटुंबातील ६ जणांवर 'मोक्का'! चार जिल्ह्यांत दहशत माजवणाऱ्या टोळीवर पोलिसांची कारवाई

पुणे । प्रतिनिधी

खून, दरोडा आणि जबरी चोरीसारखे गंभीर गुन्हे करत पुण्यासह अहिल्यानगर, सोलापूर आणि बीड जिल्ह्यांत दहशत माजवणाऱ्या एकाच कुटुंबातील सहाजणांवर मोक्का कायद्याअंतर्गत पुणे ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी टोळीला धक्का बसला आहे. टोळी प्रमुख योगेश उर्फ अटल्या ईश्वर भोसले ( २४) याच्यासह सचिन ईश्वर भोसले (२५), गहिनीनाथ ईश्वर भोसले (२७), मिलन ईश्वर भोसले,

सोन्या ईश्वर भोसले (२५) आणि युवराज उर्फ धोंड्या ईश्वर भोसले (२५, सर्व रा. बेलगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) यांच्यावर ही कारवाई केली आहे. यापैकी युवराज भोसले हा फरार असून इतर आरोपी



न्यायालयीन कोठडीत आहेत. दौंड तालुक्यातील बोरीबेल गावाच्या हद्दीतील भापकरवस्ती येथे ११ जून २०२५ रोजी भरदिवसा एका कुटुंबाला धारदार शस्त्राचा धाक दाखवून, तुमच्याकडे जे काही आहे ते द्या, अन्यथा सगळ्यांना संपवून टाकतो,

अशी धमकी देत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह ३ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल दरोड्यात लंपास करण्यात आला होता. या घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांना आरोपी शिरापूर परिसरात दुचाकीवरून येत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून टोळीप्रमुख योगेश भोसलेसह इतर आरोपींना ताब्यात घेतले आणि दौंड पोलिसांच्या स्वाधीन केले.

या प्रकरणी एकूण ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यासाठी कोल्हापूर क्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली.

# बारामतीत भोंदूगिरीचा सुळसुळाट; देव-करणीच्या नावाखाली फसवणूक वाढली

बारामती । प्रतिनिधी

प्रगतशील म्हणून ओळख असलेल्या बारामती तालुक्यात सध्या भोंदुगिरीचा विळखा घट्ट होत चालल्याचे धक्कादायक चित्र आहे. देव, करणी, पितृदोष आणि वास्तुदोष यांच्या नावाखाली अनेक स्वयंघोषित बाबांनी नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याच्या घटना उघड होत आहेत; मात्र आपले नाव बदनाम होईल, या भीतीने अनेक पीडित नागरिक तक्रार देण्यास पुढे येत नसल्याने हे प्रकार बिनधास्तपणे सुरू असल्याचे दिसून येत आहे.



दोनच दिवसांपूर्वी भोंदूबाबा मनोहर भोसले याला पोलिसांनी अटक केल्यानंतर या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे. त्याचे अनेक अनुयायी बारामती तालुक्यात असल्याचेही तपासात पुढे आले आहे.


राज्यभरात विविध भोंदूबाबांकडून फसवणुकीची प्रकरणे समोर येत असताना बारामती तालुकाही याला अपवाद राहिलेला नाही. उलट येथे अशा स्वयंघोषित बाबांचा सुळसुळाट वाढत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी देवीची स्थापना करून देतो', 'संकट दूर करतो' अशा आमिषांद्वारे लोकांची दिशाभूल करून मोठ्या रकमा उकळल्या जात आहेत. विशेष म्हणजे, अनेक वेळा शिक्षित आणि सुजाण नागरिकही या फसवणुकीचे बळी ठरत आहेत. सामाजिक दबाव, लाज आणि भीतीमुळे ते पुढे येत नसल्याने पोलिसांकडे अधिकृत तक्रारींचा आकडा कमी असला, तरी प्रत्यक्षात फसवणुकीचे प्रमाण मोठे आहे. दरम्यान, नागरिकांनी अशा भोंदूगिरीपासून सावध राहावे, कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला बळी पडू नये आणि फसवणूक झाल्यास तत्काळ तक्रार द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. समाजात जागृती निर्माण करणे आणि भोंदूगिरीविरोधात कठोर कारवाई करणे ही काळाची गरज आहे.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला येणार वेग; राज्य सरकारची ६ हजार कोटींच्या कर्जाला 'थकहमी'

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आवश्यक भूसंपादनापोटी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाची थकहमी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे भूसंपादनासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या दरांबाबत निर्णय घेता येणार असल्याने शेतकऱ्यांना लवकरच मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने १० फेब्रुवारी रोजी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात दिली होती. हे विमानतळ बांधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास



महामंडळ (एसआयडीसा), महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी), शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)

या संस्थांची मिळून एक विशेष कंपनी स्थापन करण्याचा निर्णय या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. जिल्हा प्रशासनाने ही जागा संपादित करून एमआयडीसीकडे सुपूर्त करावी, असे ठरले आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाने या भूसंपादनाच्या निधीसाठी एमआयडीसीला प्राधिकृत केले आहे. एमआयडीसीला हुडको किंवा तत्सम इतर वित्तीय संस्थांकडूनसुद्धा हे कर्ज घेण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको).

शासन निर्णयानुसार या ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय घेतला आहे. हे कर्ज फेडताना सर्वाधिक ५१ टक्के वाटा सिडकोचा असला तरी प्रमुख कर्जदार म्हणून एमआयडीसीची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, कर्ज फेडताना एमआयडीसी १५ टक्के, एमआयडीसी १९ टक्के, सिडको ५१ टक्के तर पीएमआरडीए १५ टक्के वाटा उचलणार आहे.राज्य सरकारने दिलेली थकहमी शासन निर्णय जारी झाल्यानंतर वर्षभरासाठीच असणार आहे. त्यामुळे एमआयडीसीला तातडीने कर्ज घेऊन ते जिल्हा प्रशासनाला मोबदला वितरण करण्यासाठी द्यावे लागणार आहे. राज्य सरकारने नेमलेली विशेष कंपनी हे कर्ज फेडण्यास असमर्थ ठरल्यास राज्य सरकारकडून या कर्जाची परतफेड करण्यात येणार आहे.

# पुणे विद्यापीठात उन्हाळी विज्ञान शिबिरे; विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगांची संधी

पुणे । प्रतिनिधी

उन्हाळी सुट्टीत विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना देण्यासाठी आणि प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे विज्ञान शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सायन्स पार्कतर्फे 'उन्हाळी विज्ञान शिबिरे' आयोजित करण्यात येत आहेत. ५ मे २०२६ पासून विज्ञान शिक्षण आणि संशोधन केंद्रात ही शिबिरे सुरू होणार असून, इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ती खुली आहेत.

या शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांना प्रकाशाचे परावर्तन, पेरिस्कोप व इन्फिनिटी मिरर तयार करणे, सूक्ष्मदर्शकाखाली सूक्ष्मजीवांचे निरीक्षण, इलेक्ट्रॉनिक्सचे



प्राथमिक प्रयोग, तसेच अणू व रासायनिक बंध यांचे प्रयोग अशा विविध विषयांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. याशिवाय, रोबोटिक्स आणि ड्रोनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळखही विद्यार्थ्यांना करून दिली जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी फ्लूट, गिटार, स्टेथोस्कोप तयार करणे, केमिस्ट्रीतील प्रयोग, गणिती कोडी व पॅटर्न्स, तसेच टेरेसवर पर्यावरणपूरक शेती यांसारख्या उपक्रमांचाही समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, ६ व ७ मे रोजी पालकांसाठी 'गणिताची वेगळी ओळख' ही कार्यशाळा आयोजित केली आहे. तसेच 'निसर्ग समजून घेणे' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना जैवविविधतेचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी प्राणिसंग्राहालय भेटीचे आयोजनही करण्यात आले आहे.

विज्ञान अधिक सुलभ आणि रंजक करण्यासाठी रोबोटिक्स, एरोमॉडेलिंग, सॅटेलाइट तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक विषयांवर विशेष सत्रे आयोजित केली जाणार असून, 'हँड्स-ऑन' प्रोजेक्टद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वस्तू तयार करण्याची संधी मिळणार आहे. ही शिबिरे विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षणाचा उत्कृष्ट मंच ठरणार असून, त्यांना विज्ञानाची गोडी लागण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. तसेच, काही शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तू घरी नेण्याची संधीही दिली जाणार आहे.

# पुणे एसटी विभागाकडून २०० नवीन बसची मागणी; प्रवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

पुणे विभागातील एसटी प्रवाशांचा प्रवास आता अधिक सुखकर होण्याची चिन्हे आहेत. विभागातील वाढती गर्दी आणि प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता पुणे एसटी विभाग प्रशासनाने तब्बल २०० नवीन बसची मागणी मुख्यालयाकडे केली आहे. ही मागणी पूर्ण झाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, रोजच्या गर्दीच्या कटकटीतून सुटका होणार आहे.

पुणे हे शिक्षणाचे आणि नोकरीचे केंद्र असल्याने येथून राज्याच्या कानाकोपऱ्यात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. सध्या उपलब्ध असलेल्या बसच्या तुलनेत प्रवाशांचा ओघ प्रचंड वाढला आहे.



परिणामी, अनेक मार्गांवर प्रवाशांना उभे राहून किंवा ताटकळत प्रवास करावा लागतो. हीच कटकट थांबविण्यासाठी पुणे विभागाने आता कंबर कसली असून, २०० जादा बससाठी पाठपुरावा सुरू केला आहे. या नवीन बस ताफ्यात दाखल झाल्यास फेऱ्यांची संख्या वाढेल आणि प्रवाशांना दर्जेदार सेवा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. सध्या पुणे विभागातील १४ डेपोअंतर्गत ८५२ बसद्वारे प्रवासी सेवा पुरवली जात आहे. विकेंड, सण आणि दिवाळी, उन्हाळी सुट्यांच्या काळात एसटीच्या बसगाड्यांना मोठी गर्दी होत असते. त्यामुळे या जादा बसगाड्यांची मागणी पुणे विभागाकडून केली जात आहे.

# वंदे भारत ट्रेनला पुण्याजवळ अपघात; कोच रुळावरुन घसरला

पुणे । प्रतिनिधी

मुंबईहून सोलापूरकडे धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसला पुण्याजवळ अपघात झाला आहे. पुणे रेल्वे स्थानकात प्रवेश करत असताना ट्रेनचा एक कोच रुळावरून घसरल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, ही ट्रेन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून सोलापूरकडे जात होती. पुणे स्थानकातील फलाट क्रमांक ३ वर ट्रेन येत असताना अचानक हा प्रकार घडला. डब्याची चाके रुळांवरून खाली घसरल्याचे दिसून आले. सुदैवाने, या घटनेत एकही प्रवासी जखमी झालेला नाही. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. अपघातानंतर तात्काळ दुरुस्ती आणि मदतकार्य सुरू करण्यात आले असून, घसरलेला कोच रुळावर आणण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे पुणे स्थानकावरील रेल्वे वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला असून, काही गाड्या उशिराने धावत आहेत. दरम्यान, घटनेनंतर स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, रेल्वे विभागाकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.




# उन्हाचा तडाखा ठरला जीवघेणा! जुन्नरमध्ये शेतात काम करणाऱ्या महिलेचा उष्माघाताने मृत्यू

नारायणगाव । प्रतिनिधी

जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा येथे उष्माघातामुळे एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. २७) सकाळी घडली. रूपाली भाऊ गाडगे (वय ४०) असे या महिलेचे नाव आहे.

रूपाली गाडगे ह्या गेल्या दोन दिवसांपासून कडक उन्हात शेतात खुरपणीचे काम करीत होत्या. सोमवारी सकाळी सुमारे साडेअकराच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने निमगाव सावा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष रास्ते यांनी त्यांच्यावर तत्काळ उपचार सुरू केले.



तपासणीदरम्यान त्यांचा रक्तदाब कमी झाल्याचे आढळले. प्राथमिक उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत थोडी सुधारणा झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र, अधिक तपासण्यांची गरज असल्याने त्यांना पुढील तपासणीसाठी डायग्नोस्टिक केंद्रात जाण्याचा सल्ला देण्यात आला. तपासणीसाठी जाताना वाहनात बसताना चक्कर येऊन त्या बेशुद्ध पडल्या. त्यानंतर काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला. रूपाली गाडगे यांच्या पश्चात पती व तीन मुले असा परिवार आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात काम टाळावे, अशीही सूचना वैद्यकीय तज्ज्ञांनी केली आहे. याबाबत जुन्नरचे तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, संबंधित महिला शेतात काम करीत असताना चक्कर येऊन पडली. मृत्यू नेमका कशामुळे झाला? हे शवविच्छेदनानंतर स्पष्ट होईल.

# उरुळी कांचनमध्ये महिला पोलिस अधिकाऱ्याचा सासरकडून छळ; गुन्हा दाखल

उरुळी कांचन: पुणे ग्राामीण पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या महिला पोलिस यांना सासुरवास झाल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सासू, पतीसह सासरच्या ६ जणांविरुद्ध छळ आणि मारहाणीचा गुन्हा उरुळी कांचन पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे.

प्रियंका शिवकुमार खबाले (वय २५, रा. सध्या रा. शिंदवणे, ता. हवेली मूळ रा. रांझणी, ता. माढा, जि. सोलापूर) असे छळ झालेल्या महिला अंमलदाराचे नाव आहे. याप्रकरणी खबाले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पती शिवकुमार श्यामराव खबाले, सासू शोभा शामराव खबाले, सासरे श्यामराव खबाले, नणंद लक्ष्मी खबाले, दीर अमर खबाले, दीर मंगेश खबाले, (सर्व रा. बसस्थानकाजवळ कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव) या सासरकडील मंडळींवर गुन्हा दाखल झाला आहे.

प्रियंका यांचा विवाह डिसेंबर २०२१ मध्ये कळंब (जि. धाराशिव) येथील शिवकुमार खबाले यांच्याशी झाला होता. लग्नाच्या वेळी प्रियंका यांच्या कुटुंबीयांनी ५ तोळे सोने, ४ लाख रोख आणि ५ लाखांचे प्रापंचिक साहित्य दिले होते. लग्नानंतर काही महिने सुखात गेल्यानंतर प्रियंका आजारी पडल्या असता,




सासरच्यांनी त्यांच्या उपचाराकडे दुर्लक्ष केले. 'तुझ्या आई-वडिलांकडे जाऊन उपचार कर,' असे म्हणत त्यांना माहेरी पाठवून दिले.

प्रियंका यांनी पुढील शिक्षणासाठी संगणक क्लास लावल्यानंतर सासरच्या मंडळींनी त्यांना घरात कोंडून ठेवण्याचा प्रयत्न केला. क्लासला जाऊ नये म्हणून त्यांना घरातील कामाचा जादा बोजा दिला जात होता. तरीही प्रियंका यांनी पोलिस भरतीची तयारी सुरू केली. त्यांनी पोलिस भरतीची कॅडमी लावली असता, त्यांच्या पतीने दारू पिऊन तिथे येत 'भरती झालीस तर तुला नांदवणार नाही,' अशी धमकी दिली होती.प्रियंका २९ मे २०२३ रोजी पोलिस दलात भरती झाल्या. ट्रेनिंग पूर्ण करून कर्तव्यावर रुजू झाल्यानंतर देखील सासरच्यांकडून त्यांचा छळ सुरूच होता. प्रियंका त्यांच्या पगारातून घरातील खर्च चालवत होत्या, तरीही पती आणि सासरच्या मंडळींनी त्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्यांना मारहाण केली. 'तुझ्यासारख्या स्त्रीला आमच्या घरात जागा नाही,' असे म्हणत डिसेंबर २०२५ मध्ये त्यांना घराबाहेर काढले. सध्या प्रियंका या शिंदवणे येथे भाड्याच्या खोलीत एकट्याच राहत आहेत. तिथे आल्यावरही पतीने दोन ते तीन वेळा येऊन त्यांना शिवीगाळ व मारहाण केली. सासरच्या लोकांच्या सततच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून अखेर प्रियंका यांनी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी याप्रकरणी विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# पीएमपी बस पळवणारा तरुण निघाला मनोरुग्ण! बस चोरणाऱ्या गोपालसिंगबाबत धक्कादायक खुलासा

पुणे । प्रतिनिधी

महापालिका भवन परिसरातून शनिवारी पीएमपी बस पळवून नेल्याच्या घटनेतील आरोपी मनोरुग्ण असल्याचे उघड झाले आहे. तो मुळचा उत्तराखंडचा असून मुंबईत चालकाची नोकरी शोधण्यासाठी आला होता. तेथून तो पुण्यात कसा आला हे तो सांगू शकत नाही. त्याला फक्त कार, जीप सारखी लाईट व्हेईकल वाहने चालवता येतात. गोपालसिंग बिलबलसिंग राणा (२०, रा. उत्तराखंड )असे त्याचे नाव आहे.

पीएमपीच्या स्टेअरिंगजवळची चावी चालक विसरुन गेला होता. तेथून जाणाऱ्या गोपालसिंगने बस सुरू केली आणि महापालिका भवन, जंगली महाराज रस्त्यावरुन बस






गोखले (फर्ग्युसन रस्ता) रस्त्यापर्यंत नेली. गोखले स्मारक चौकात एक कार्यक्रम सुरू होता. पीएमपी बस पळवून नेल्याची माहिती मिळाल्यानंतर चौकात बंदोबस्तास असलेल्या पोलिसांनी प्रसंगावधान राखून बस अडविली. गोपालसिंगला ताब्यात घेतले.

चौकशीत राणा असंबध्द उत्तरे देत आहे. यामुळे त्याच्या परिवाराबद्दल जास्त माहिती पोलिसांना मिळू शकली नाही स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारातून २५ जानेवारी २०१२ रोजी संतोष माने याने एसटी बस पळवून नेली होती. भरधाव एसटीने एकापाठोपाठ वाहनांना धडक दिली. शंकरशेठ रस्ता, स्वारगेट परिसरात त्याने पादचारी, तसेच वाहनांना धडक दिली होती. या घटनेत नऊजणांचा मृत्यू झाला होता, तसेच २७ जण जखमी झाले होते. गोपालसिंगच्या शनिवारच्या घटनेने संतोष माने घटनेची आठवण करून दिली.